अडत व्यापारी शिक्षणसंस्थेच्या देगलूर महाविद्यालय, देगलूर चे वार्षिक प्रकाशन

वर्ष चौथे ☐ अंक चौथा ☐ एकोणीसशे सत्तर – एकाहत्तर

# अभिव्यक्ती

(५)

# देगलूर महाविद्यालयाचे

## – प्राध्यापक –

श्री. हेमचंद्र धर्माधिकारी (प्राचार्य व तत्वज्ञान विभाग प्रमुख)
श्री. रवीन्द्र मनोहर
श्री. लक्ष्मीकांत तांबोळी (मराठी विभाग प्रमुख)
श्री. सुग्राम पुल्ले
श्री. सत्यनारायण जाजू (हिन्दी विभाग प्रमुख)
श्री. हरिकिशन राठौर
श्री पुरुषोत्तम देशमुख (इंग्रजी विभाग प्रमुख)
श्री. पंढरीनाथ लांडगे
श्री. रमेश देशमुख
श्री. गोविंद गोपछडे (राज्य शास्त्र विभाग प्रमुख)
श्री. रवीन्द्र कुळकर्णी
श्री. रामविलास बाहेती (अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
श्री. रामचंद्र घोंगडे
श्री दत्तप्रसन्न साठे (इतिहास विभाग प्रमुख)
श्री. रामप्रसाद वलगावत
श्री. मनोहर सोनटक्के (वाणिज्य विभाग प्रमुख)
श्री. श्रीकृष्ण धर्मापुरीकर
श्री. प्रभाकर डुब्बेवार
श्री. माधव कुळकर्णी (गणित विभाग प्रमुख)
श्री. विनायक कठाळे
श्री एकनाथ विसपुते (रसायनशास्त्र विभाग प्रमुख)
श्री. लक्ष्मीकांत करडखेडकर
श्री. रघुकृष्ण शेटये (वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख)
श्री. गीताराम कुळकर्णी
श्री. शंकर देशमुख (प्राणीशास्त्र विभाग प्रमुख)
श्री. व्यंकटेश जोशी
श्री. नारायण कुळकर्णी (पदार्थ विज्ञान प्रमुख)
श्री. विश्वनाथ येरमुने

एकोणीसशे सत्तर–एकाहत्तर

वार्षिक : वर्ष चौथे : अंक चौथा

# अभिव्यक्ती

अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे

सांगली महाविद्यालय, सांगली.

प्रकाशक :
प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी.

या अंकाचे संपादन :
प्रा. पुरुषोत्तम द. देशमुख.

विद्यार्थी संपादक :
श्री. सुभाष देशपांडे - मराठी
बी.ए. (तृ. व.)

कु. हसीना बेगम - हिन्दी
बी.ए. (प्र. व.)

मुद्रक :
मनोज मुद्रणालय, देगलूर.

---

लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**म**हाविद्यालयाविषयी आस्था असणाऱ्या सर्व सुजाण वाचकांच्या हाती हा अंक देताना आनंद होत आहे.

अभिव्यक्तीचा हा चौथा अंक. यापूर्वीचे तीन अंक देगलूर आणि देगलूरच्या आसपासच्या वैशिष्ट्यांची चौफेर माहिती घेऊन आपणाकडे आले. त्यात विद्यार्थ्यांबरोबर प्राध्यापक आणि कांही जाणकारांनी देगलूरचे यथातथ्य आणि सुस्पष्ट दर्शन घडवले. किंबहुना प्राध्यापकांच्याबरोबर विद्यार्थ्यांनी आतापर्यंत लिहिले. हा अंक केवळ विद्यार्थ्यांचे लिखाण सादर करीत आहे.

आणि या अर्थाने, क्रमाने चौथा असूनही हा पहिलाच अंक ! विद्यार्थ्यांना लेखनाचे धडे दिले, सवय लावली. त्यांच्या लिखाणातल्या उणीवा, दोष त्यानाच समजले, आणि हा अंक तयार झाला.

मराठी मातृभाषा आणि हिन्दी राष्ट्रभाषा म्हणून मुला-मुलींना लिहिणे फारसे जड जात नाही. पण इंग्रजीची गोष्ट थोडी वेगळी पडते. त्यांचे इंग्रजी दुरुस्त करता करता त्या लिखाणाचा आत्माच बदलून जातो, आणि हा लेख, ही कथा किंवा ही कविता आपली आहे हे त्यानाही ओळखू येत नाही. तसे होऊ नये, म्हणून मागील वर्षाप्रमाणे याही वर्षी इंग्रजी विभाग या अंकात अनुपस्थित आहे.

विविधता असलेला हा अंक आपल्या पसंतीस उतरण्यास प्रत्यवाय नसावा.

# राष्ट्रीय एकात्मतेची प्रतिज्ञा

भारताचा निष्ठावंत नागरिक या नात्याने, मी सर्व प्रकारचे मतभेद शांततेच्या मार्गाने मिटविले जावेत या सुसंस्कृत समाजाच्या सर्वमान्य तत्त्वावर माझी दृढश्रद्धा व्यक्त करतो; आणि लोकांमधील भावनिक एकात्मतेची निकड लक्षात घेऊन धार्मिक, भाषिक, प्रादेशिक अथवा अन्य सार्वजनिक विषयांबाबतच्या कोणत्याही विवादामध्ये हिंसात्मक मार्गाचा कधीही अवलंब करणार नाही अशी प्रतिज्ञा करतो.

मंत्री महोदयांची महाविद्यालयास भेट



ना. पु ग. खेर (नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य) संस्थेचे सचिव श्री नारायणशेठ चिद्रावार व प्राचार्य धर्माधिकारी यांच्यापाशी महाविद्यालयाविषयी आस्थापूर्वक चौकशी करताना

## प्रकट तत्वचिंतन



डॉ. सुरेंद्र बारलिंगे तत्वज्ञान विभाग प्रमुख पुणे विद्यापीठ,
विद्यार्थ्यांशी बोलताना

## वसतीग्रहाच्या गणेशोत्सवाची सांगता



प्राचार्य धर्माधिकारी प्रा. मे. पु. रेगे यांचा परिचय करीत असताना

# मृत्योर्मा अमृतं गमय

## भारतरत्न सी. व्ही. रामन :

अध्यात्माच्या भूमीत उपजलेल्या डॉ. चंद्रशेखर वेंकट रामन यांचे गणित, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र आदी अनेक क्षेत्रांत देदीप्यमान संशोधन. 'रामन इफेक्ट' चे जनक देशोदेशीच्या विद्यापीठांकडून श्रेष्ठ सन्मानांचा दुर्लभ वर्षाव. विज्ञानाचे नोबेल पारितोषिक मिळविणारी आशिया खंडातील पहिलीच व्यक्ती. भारत-सरकारने 'भारत रत्न' पदवी देऊन स्वतःचाच गौरव करुन घेतला ! 'रामन रीसर्च इन्स्टिट्यूट' स्थापन करुन शास्त्रज्ञांची एकपिढी निर्माण केली. भारताच्या या थोर सुपुत्राच्या स्मृतीस आमचे नम्र अभिवादन !

## बॅ. नाथ पै :

मृत्यू सर्वव्यापी आहे हे सर्वांनाच माहीत असते. पण त्याचा पावलोपावली अनुभव घेणारे फार कमी. बॅ. नाथ पै त्यापैकी एक ! त्यांच्याशी सामना देण्याचे क्षण आयुष्यात अनेक आले. पण त्याला प्रत्येकवेळी चकवा दिला. जगायचे होते ते सामान्यांना जगवण्यासाठी, त्यांच्यासाठी मरण्यासाठी ! राजकारणात उडी घेतली तेव्हापासून मृत्यूने त्यांच्यावर यशस्वी झडप घातली, तोपर्यंत ! अमोघ वक्तृत्वाने संसद गाजवली ५७ पासून ७१ पर्यंत. त्यांच्या वाणीत सागराचे संगीत होते. संस्कृत, मराठी, हिन्दीबरोबरच अनेक परदेशी भाषांवर प्रभुत्व होते. Gentleman Politician असा नेहरु त्यांचा उल्लेख करीत. कवितेच्या भेंड्या खेळतांना मॅक्बेथचे it out, brief candle म्हणणाऱ्या पैंचीच जीवनज्योत अकस्मात मालवली ! भारत त्यांना कधी विसरणार नाही!

## डॉ. इरावती कर्वे :

मृत्यूचे सर्वव्यापकत्व अनुभवणारी दुसरी व्यक्ती म्हणजे डॉ. इरावती कर्वे. सतत दहा वर्षे मृत्यूशी झुंज देत राहिल्या. मृत्यू अक्षरशः त्यांची प्रतीक्षा करीत राहिला. त्यांचे काम पूर्ण झाल्यावर आणि त्यांच्या संमतीनेच त्यांना 'सामोरा' गेला ! मानववंशशास्त्राच्या व्यासंगाचा लाभ परदेशी विद्यापीठानाही घडवून दिला. महाभारत, रामायणाच्या मंथनातून नवी भाष्ये निर्माण झाली. एका बाजूला प्रखर प्रज्ञा आणि दुसऱ्या बाजूला तरल कल्पनाविलास असा अद्भुत योग ! कन्या, पत्नी, माता आदी सर्वच भूमिका सहजपणे जगल्या 'इरावती' ही ब्रह्मदेशातली नदी. नदीचा तो अखंड प्रवाहीपणा बाईच्या जीवनात ओतप्रोत भरलेला होता. 'युगांत' आणि 'परिपूर्ती' सारखे अनेक ग्रंथराज मागे ठेवून अहेवपणी इरावतीने महायात्रेचे प्रस्थान ठेवले !

## डॉ. कन्हैयालाल मुन्शी :

प्रख्यात कायदेतज्ञ, भारताच्या घटनेचे एक शिल्पकार श्री अरविंदाचे शिष्य आणि जिना, ॲनी बेझंट गांधी, पटेल, नेहरु यांचे सहकारी. जुन्या मुंबई राज्याचे गृहमंत्री आणि हैदराबादच्या पोलिस ॲक्शनचे सूत्रधार. ज्या हातात वेळोवेळी बंदूक घेतली त्याच हातात लेखणी घेऊन सव्यसाची लेखक असा लौकिक संपादन केला. गुजराती, इंग्रजी मधील कथा-नाटकाप्रमाणे भगवत्गीता, रामायण-महाभारत, भारतीय संस्कृती याविषयावर संशोधनपर आणि ललित्यपूर्ण भाष्ये लिहिली. 'मुंबईच्या भारतीय विद्याभवन' चे जनक अशा अनेक रुपानी तेवत राहणाऱ्या या ज्ञान ज्योतीस आमचे वंदन !

## एडवर्ड मॉर्गन फॉस्टर :

" **मी** दोन कारणांसाठी लिहितो; एक म्हणजे पैशासाठी, आणि दुसरे म्हणजे मला ज्यांच्याविषयी आदर आहे त्यांचा आदर मिळविण्यासाठी " असे अगदी प्रामाणिकपणे म्हणणारा विसाव्या शतकातल्या थोर इंग्रजी कादंबरीकारांपैकी एक. A Passagge to India, where Angels Fear to Tread वगैरे अनेक लोकप्रिय कादंबऱ्या. तसेच, ' कादंबरी ' या वाङ्मयीन प्रकाराचेही शास्त्रशुद्ध विवेचन. एकून मानवी जीवनाबरोबरच भारत, त्याची संस्कृती व जीवन यांचे यथातथ्य चित्रण करणाऱ्या या लेखकाने भारतास अनेकदा भेटी दिल्या. फॉस्टर गेले, त्यांचे लिखाण काळाच्या प्रवाहात नेहमीच टिकून राहील !

## चित्रकार दलाल :

**दी**नानाथ दलाल-रंगांचा जादूगार, आधुनिक ' रविवर्मा ' रंगांच्या विलासाबरोबरच प्रतिभेचे मनोहारी नर्तन ! साध्या प्रसंगानाही ' दलालपण ' देण्याची असामान्य किमया. संगीतातले ' राग ' रंग-रेखातून आळवले. साहित्यातल्या नायिकांच्या भाव-विभ्रमाना रंग-रुप दिले. लहान-मोठ्या कलावंतांचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष गुरु. महाराष्ट्राचा आद्य व्यंगचित्रकार. प्रचलित रुक्ष राजकारणाला विनोदाने खास रंगत आणली. स्वतःची अशी खास शैली करणा-या रंगाच्या या राजाने सारे कला-विश्वच बेरंग केले ! त्यांच्या पश्चातही त्यांच्या कलाकृती रंगांची उधळण सदैव करीत राहतील !

# महाविद्यालयाचे १९७०-७१ चे इतिवृत्त

## श्रमदान योजना :

एप्रिलच्या पहिल्या तारखेपासून सुरु झालेली श्रमदानाची योजना आजपर्यन्त अखंडपणे चालू आहे. विद्यार्थ्यांचा या योजनेस मिळालेला प्रतिसाद स्पृहणीय आहे. वर्षभर या योजनेखाली विद्यार्थ्यांनी श्रमदान करुन अनेक कामे केली. सुमारे ८० ते १०० विद्यार्थ्यांनी या योजनेत भाग घेतला. विद्यार्थ्यांचे यादृष्टीने करावे तेवढे कौतुक थोडेच आहे.

## महाविद्यालयाचे उद्यान :

वर्षभरात विद्यार्थ्यांनी श्रमदानाने सुमारे ३००० ते ३५०० लांबीचे रस्ते महाविद्यालयाच्या आवारात तयार केले. रस्त्याची रुंदी १० फुट आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयासाठी विस्तीर्ण उद्यानाची योजना विद्यार्थींनी हाती घेतली. व्यवस्थितपणे आखणी करुन विविध प्रकारची या झाडांना सुमारे १ हजार झाडे विद्यार्थींनी लावली. उन्हाळ्यातही या झाडांना पाणी वाहून घालण्याचे अवघड काम त्यांनी न कंटाळता चिकाटीने चालू ठेवले आहे.

## श्रमसहभाग वसतीगृह :

श्रमदान योजनेचे मूर्त स्वरुपात आलेले मोठे यश 'श्रमसहभाग विद्यार्थी वसतीगृहाच्या' रुपाने आज महाविद्यालयाच्या आवारात पूर्ण होत आलेले आहे. विद्यार्थ्यांच्या शक्तीला विधायक वळण लावल्यास त्यातून किती मोठी कामे होऊ शकतात याचे हे प्रतीक आहे. श्रमदानाची योजना अखंडपणे चालू ठेवण्याचा विद्यार्थ्यांचा निर्धार आहे. या कार्यात प्राचार्य धर्माधिकारी, प्रा. बलरावत व प्रा. मनोहर यांचाही मोठा वाटा आहे.

## मराठी वाङ्मय मंडळ :

१) मराठी वाङ्मय मंडळातर्फे अभिव्यक्ती मासिक वार्षिकच्या संपादकपदासाठी निबंधस्पर्धा घेण्यात आली. मासिक अभिव्यक्तीसाठी श्री. विजय वाकडे बी. ए. द्वितीय व वार्षिक अभिव्यक्तीसाठी श्री. सुभाष देशपांडे बी. ए. तृतीय यांची निवड झाली.

२) मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन चालू शैक्षणिक वर्षी महाराष्ट्रातील ख्यातनाम व सुप्रसिद्ध कवी वा. रा. कान्त यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी त्यांनी कवितेसंबंधाने आपले विचार प्रगट केले. त्यांच्या काव्यवाचनाचा बहारदार कार्यक्रमही झाला.

३) डॉ. पठान, रीडर, मराठवाडा विद्यापीठ, यांचे मराठीतील 'पंडिती' काव्यावर व्याख्यान झाले.

४) 'तावरे कलापथक' यांचा मराठी वाङ्मय मंडळातर्फे पोवाड्यांचा व राष्ट्रीय गीतांचा कार्यक्रम अतिशय रंगतदारपणे पार पडला.

## हिन्दी विभाग :

हिन्दी- दिनानिमित्त दि. १४ सप्टेंबर रोजी महाविद्यालयाच्या वसतिगृहात एक कार्यक्रम आयोजित करण्यांत आला. या प्रसंगी प्रा. दत्तप्रसन्न साठे यांचे " क्रांतिकारक खुदीराम बोस " या विषयावर उद्बोधक भाषण झाले. प्रारंभी प्रा. जाजू यांनी भारतीय भाषाच्या परस्पर सहकार्यावरच हिन्दीचा विकास अवलंबून आहे असे आपल्या भाषणात विशद केले.

## महाविद्यालय परीक्षा विभाग :

विद्यार्थ्यांची संख्या जशी वाढते तशी अभ्यासावरची मिठी ढिली होते. विद्यापीठीय परीक्षात नापास होणारे बरेच विद्यार्थी हे सिमान्त गुणांनी अनुत्तीर्ण होतात. त्यांचेकडून जर वेळीच अत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक तेवढा अभ्यास करवून घेतल्यावर हे विद्यार्थी पास होऊ शकतात असे प्रत्ययास आल्यामुळे यावर्षी पासून प्रत्येक विद्यार्थ्यांकडून अभ्यासपरीक्षा (Tutorials) तयार करवून घेण्यात आल्या. परीक्षेत बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांकडून विषयामागे सहा प्रश्न लिहून घेण्यात आले. त्याशिवाय त्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेस बसण्याची परवानगीच देण्यात आली नाही. हा नियम सर्व वर्गानाच लागू करण्यात आला. प्रत्येक पालकांस पत्र पाठवून संबंधित विद्यार्थ्यांची प्रगती कळवली व त्याची अधिक काळजी घेण्यास त्यांना सुचविण्यात आले.

## नियोजन मंडळ :

### १) पदधिकाऱ्यांची निवड :

१९७०-७१ या शैक्षणिक वर्षा करिता नियोजन मंडळाचे पदाधिकारी म्हणून ऑगस्ट १९७० मध्ये खालील व्यक्तींची निवड करण्यात आली.

अध्यक्ष :- प्रा. रा. वा. धोंगडे.

सचिव :- श्री. सुभाष देशपांडे.

उपसचिव :- श्री. के. टी. कांबळे.

### २) प्रश्नावली :

यावर्षी नियोजन मंडळाने एखादी पाहणी हाती घ्यावी, व ती पार पाडावी असे नियोजन मंडळाच्या वस्तीगृहामध्ये भरलेल्या पहिल्या बैठकीत ठरविण्यात आले. त्याप्रमाणे पहाणीसाठी प्रश्नावली तयार करण्यात येऊन, त्या प्रश्नावलीच्या आधारे देगलूर तालुक्याच्या परिसरातील दहा खेड्यातील स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सामाजिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्याचे ठरले.

### ३) पाहणी :

त्याप्रमाणे होट्टल या देगलूर तालुक्यातील ऐतिहासिक खेड्यापासून पाहणीचे कामास सुरुवात झाली. आजतागायत होट्टल, मरखेल, करडखेड, वझर, हनेगाव, खानापूर, सांगवी व तमलूर या खेड्यांचे पहाणीचे म्हणजेच प्रश्नावली भरुन घेण्याचे काम पूर्ण झाले. या प्रत्यक्ष पाहाणीत विद्यार्थ्यांचा महत्वाचा भाग असल्यामुळे वार्षिक परीक्षेच्या अभ्यासात गुंतल्यामुळे दोन खेड्यांचे पहाणीचे काम अपूर्ण राहीले वार्षिक परीक्षा संपल्यानंतर या पहाणीत सहभागी असलेले विद्यार्थी पूर्वीच्याच जोमाने या राहिलेल्या दोन खेड्यांचे पहाणीचे काम पूर्ण करतील व निष्कर्षासाठी लागणारी पूर्वतयारी तक्ते तयार करणे वगैरे पूर्ण करतील अशी अपेक्षा आहे. नवीन वर्षाचे सुरुवातीस नियोजन मंडळ या पहाणीचा अहवाल सादर करु शकेल असा विश्वास वाटतो.

या पाहणीसाठी ज्यांचा ज्यांचा हातभार लागला त्यांचा नामनिर्देश टाळणे अत्तुच्य ठरेल. खेड्यातील सरपंचाकडून या संदर्भात संमिश्र अनुभव आला. विशेषतः होट्टलचे श्री. देशमुख, मरखेलचे ग्रामसेवक हनेगाव, खानापूर व सांगवीचे सरपंच यांचे हार्दिक सहकार्य लाभले हे नमूद करावेसे वाटते. प्राध्यापकांपैकी प्रा. मनोहर व प्रा. लांडगे यांनीही

या पहाणीत प्रत्यक्ष भाग घेऊन सहयोग दिला. खालील विद्यार्थ्यांचा सहभागी व उत्साही गणक (Investigator) म्हणून काम केले. त्यातील प्रमुख आहेत, सर्वश्री सुभाष देशपांडे, के. टी. कांबळे, कांबळे, जाधव, अब्दुल नबी, सुभाष बडगावे, आचमारे, सोनटक्के.

### ४) उद्घाटन :

महाविद्यालयातील नियोजन मंडळाचे औपचारिक उद्घाटन तेव्हांच्या संसदचे माननिय खासदार श्री. जॉर्ज फर्नांडीस यांच्या शुभहस्ते दि. ५-१२-७० रोजी झाले. त्यांनी भारताचे सध्याचे नियोजन म्हणजे पोरखेळाचा प्रकार झाल्याचे आपल्या भाषणात सांगितले.

### ग्रंथालय :

दर शैक्षणिक वर्षाच्या आरंभी ग्रंथालयासाठी कांही अंदाजी रक्कम बाजूला ठेवली जाते. त्यातून साधारणपणे प्रत्येक विषयासाठी रु. ५०० याप्रमाणे सर्व विषयासाठी नवनवी पुस्तेके मागविली जातात. विद्यार्थ्यांना संदर्भग्रंथ म्हणून आवश्यक असणारी व शिवाय ललित साहित्य यांचा दरवर्षीच या रक्कमेत सामवेश असतो. मराठी वाङ्मयाचे अद्ययावत ग्रंथालय महाविद्यालयात असल्याचा मराठवाडा विद्यापीठ श्रेष्ठिनी दिला आहे. सुमारे १०,००० पुस्तके असलेल्या या ग्रंथालयावर आजवर पाऊनलाखाइतकी रक्कम खर्च झाली आहे.

याखेरीज मराठी, हिन्दी, इंग्रजी भाषेतील सर्व प्रमुख दैनिके, साप्तहिके, पाक्षिके व मासिके त्यांचा लाभ घेताना दिसतात. यावर्षापासून वाचनालयात विद्यार्थ्यांना अभ्यासाची पुस्तकेही देण्यात येणार आहेत. यामुळे महाविद्यालयात असतांनाच त्यांचा वेळ सत्कारणी लागणार आहे.

## विद्यार्थी साहाय्यक निधी :

आमच्या महाविद्यालयात गेल्या चार वर्षापासून प्राचार्य धर्माधिकारी यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली विद्यार्थी सहाय्यक निधीचे कार्य मोठ्या प्रमाणावर चालले आहे. विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पुस्तकांत दरवर्षी उल्लेखनीय भर पडते. महाविद्यालयातील गरीब मुलांना जास्तीतजास्त पुस्तके कशी देता येतील याचा विचार आणि प्रयत्न करण्यात आला.

महाविद्यालयाच्या तिन्ही विभागात पुढील-प्रमाणे पुस्तके विद्यार्थी सहाय्यक निधीतर्फे वाटण्यात आली.

| | |
|---|---|
| कला विभाग | ८८४ पुस्तके |
| वाणिज्य विभाग | ३११ ,, |
| विज्ञान विभाग | ३६६ ,, |

कला विभागात वाटण्यात आलेल्या ८८४ पुस्तकांचा लाभ ४२० विद्यार्थ्यांना मिळाला. वाणिज्य विभागात वाटण्यात आलेल्या ३११ पुस्तकांचा लाभ ११३ विद्यार्थ्यांना मिळाला तर विज्ञान विभागातील वाटण्यात आलेल्या ३६६ पुस्तकांचा लाभ १०३ विद्यार्थ्यांना मिळाला.

महाविद्यालयातील प्रत्येक शाखेच्या सर्व वर्गांना म्हणजे पदवी पूर्व, प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष-वरील पुस्तके देण्यात आली. प्रत्येक शाखेतील वर्गवार दिलेल्या पुस्तकांची आणि त्याचा फायदा मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या खालील प्रमाणे –

अ) कला विभाग :–

| | पुस्तकांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| पदवी पूर्व | ५९१ | २८३ |
| बी. ए. प्रथम वर्ष | ६८ | ५३ |
| बी. ए. द्वितीय वर्ष | १३१ | ५८ |
| बी. ए. तृतीय वर्ष | ९४ | २८ |

## ब) वाणिज्य विभाग :-

| | पुस्तकांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| पदवी पूर्व वाणिज्य | १९२ | ६५ |
| बी. कॉम. प्रथम वर्ष | ४० | २५ |
| बी. कॉम. द्वितीय वर्ष | २९ | १० |
| बी. कॉम. तृतीय वर्ष | ५० | १३ |

## क) विज्ञान विभाग :-

| | पुस्तकांची संख्या | विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| पदवी पूर्व | १७४ | ४६ |
| बी. एस्सी. प्रथम | ८५ | २८ |
| बी. एस्सी. द्वितीय | ५५ | २० |
| बी. एस्सी. तृतीय | ५२ | ९ |

पुढील वर्षासाठी म्हणजे ७१-७२साठी विद्यार्थी सहाय्यक निधीतर्फे अधिकाधिक पुस्तके गरीब तसेच होतकरू विद्यार्थ्यांना कशी देता येतील, विद्यार्थ्यांची संख्या अंदाजे किती वाढेल आणि त्या प्रमाणात किती अधिक पुस्तके मागवावी लागतील याचा विचार करण्यासाठी प्राचार्य धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी सहाय्यक निधीशी संबधित प्राध्यापकांची बैठक घेण्यात आली त्यात प्रभारी प्राध्यापक श्री रविन्द्र कुलकर्णी, प्रा. प्रभाकर डुब्बेवार आणि प्रा. गीताराम कुलकर्णी यांनी भाग घेऊन चर्चा केली.

१९७०–७१ या शैक्षणिक वर्षाच्या सुरवातीला विद्यार्थी सहाय्यक निधीतर्फे पुस्तके वाटण्यात आली त्या कामात संबंधित प्राध्यापकांशिवाय महाविद्यालयातील ग्रंथपाल श्री पत्तेवार आणि त्यांचे सहकारी श्री पेंडलवार यांनी सहाय्य केले. महाविद्यालयातील बऱ्याच विद्यार्थ्यांनी वाटपाचा फायदा घेतला. पुढील वर्षी विद्यार्थ्यांकडून असाच प्रतिसाद मिळेल ही आशा आहे.

## आमचे वसतिगृह :

येथील सर्वसाधारण विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन चार वर्षापूर्वी प्राचार्य धर्माधिकारी यांनी हे वस्तीगृह स्थापन केले. अगदी गरीब विद्यार्थ्यालाही परवडेल असेच किमान शुल्क त्याला राहण्या जेवण्यासाठी द्यावे लागते. तेही नाही जमले तर त्याने महाविद्यालयाच्या श्रमदान योजनेमध्ये भाग घ्यावा. अशाप्रकारे तो महाविद्यालयास आपले श्रम आणि घाम अर्पण करुन स्वतःची भाकरी मिळवू शकतो अर्थात परीक्षेतली गुणवत्ता हा निकष आहेच. गरीब आणि होतकरूंची राहण्या-जेवण्याची जशी सोय पाहिली जाते तसेच त्यांच्या बौधिक विकासाकडेही लक्ष पुरवले जाते.

## भाषणे–बौद्धिके :

यासाठी स्थानिक वा परगावच्या वक्त्यांची भाषणे. प्राध्यापकांची विशेष व्याख्याने, विद्यार्थ्यांची बौद्धिके असे कार्यक्रम ठेवले जातात. गणेशोत्सव साजरा होत असतो. या कार्यक्रमात प्रा. घोंगडे यांचे ' नियोजन व सामाजिक न्याय, ' प्रा. मनोहर यांचे " लोकशाही एक फसवा शब्द " प्रा. कठाळे यांचे 'आधुनिक गणित" प्रा. फुले यांचे "नामदेव" प्रा. साठे यांचे ' हुतात्मा पानसरे" अशी व्याख्याने झाली. स्थानिक कवि संमेलन तसेच भूमि बळकाव मोहिम योग्य की अयोग्य हा परिसंवाद झाला. भारतीय किर्तीचे विचारवंत प्रा. मे. पुं. रेगे यांचे 'आधुनिक बनण्याची आवश्यकता' या विषयावर लालित्यपूर्ण भाषण झाले.

## वाचनालय :

विविध विषयांवरील अशा व्यख्याना शिवाय वसतीगृहासाठी एक स्वतंत्र वाचनालयही आहे. येथे अभ्यासाच्या पुस्तकाव्यतिरिक्त इतर ललित पुस्तके तसेच वर्तमानपत्रेही विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी ठेवलेली असतात.

## विद्यार्थी वस्तु भांडार :

१५ जून १९६८ रोजी प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयात विद्यार्थी वस्तु भांडाराची स्थापना करण्यांत आली.

प्रा. प्रभाकर डुब्बेवार सध्या विद्यार्थी वस्तु भांडाराचे प्रभारी प्राध्यापक आहेत. विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन साहित्य पुरविणे व त्यातून जो नफा मिळेल तो वसतीगृहास देणगी म्हणून देणे हे प्रमुख उद्देश आहे. विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षात. इंग्रजी पुस्तके, भाषा विषयक पुस्तके, वह्या. डिसेक्शन बॉक्सेस्, हारबेरियम शीट्स, फोल्ड नोट बुक्स, टेबलटेनिस बॉल्स व बिस्कीटस्‌चा पुरवठा करण्यांत आला. मागील वर्षी भांडारास (१९६९-१९७०) रु. १७०० नफा झाला त्यापैकी रु १००० वसतीगृहास देणगी म्हणून देण्यात आली आहे. भांडारात एक पगारी नोकर श्री खंडगावे विक्रीचे कामकाज पाहतात. प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांकडून जवळजवळ रु. २००० मात्र भांडवल जमा करण्यांत आले आहे.

भांडाराची आर्थिक प्रगतीत भर टाकण्याच्या दृष्टीने प्रा. प्रभाकर डुब्बेवार सदैव प्रयत्नशील असतात. तसेच भांडाराचे व्यवहार दिवसे दिवस वाढविण्याच्या हेतूने अध्यक्ष प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी, प्रा. जाजू, प्रा. बाहेती प्रा. तांबोळी, प्रा. धर्मापुरीकर प्रयत्नशील असतात.

## वक्तृत्व स्पर्धा :

आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी खालील ठिकाणी वक्तृत्व स्पर्धेत भाग घेवून महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

### अंबाजोगाई :

अंबाजोगाई (जि. बीड) येथे झालेल्या नाना पालकर वक्तृत्व स्पर्धेसाठी खालील दोन विद्यार्थी पाठविण्यात आले.

१) वाघमारे नागोराव लक्ष्मण बी. ए. प्रथम वर्ष

२) सोनटक्के विश्वंभर माणिकराव बी. ए. प्र. वर्ष

### धर्माबाद :

लालबहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद, जि. नांदेड येथे झालेल्या पद्मश्री शामरावजी कदम वादविवाद स्पर्धेत भाग घेण्यासाठी खालील विद्यार्थी पाठविण्यात आले.

१) देशमुख रेणुकदास शेषराव बी. ए. तृतीय वर्ष

२) जोशी गंगाधर यशवंतराव बी. ए. द्वितीय वर्ष

### औरंगाबाद :

औरंगाबाद येथे झालेल्या रानडे आंतर महाविद्यालयीन वादविवाद स्पर्धेसाठी दोन विद्यार्थ्यांचा एक संघ पाठविण्यात आला.

१) आचमारे के. एस. बी. ए. द्वितीय वर्ष

२) देशमुख आर. एस. बी. ए. तृतीय वर्ष

औरंगाबाद येथील बलवंत मोफत वाचनालयातर्फे झालेल्या टिळक वक्तृत्व स्पर्धेत श्री. विजय वाकडे यांनी भाग घेतला.

### देगलूर :

देगलूर नगरपालिकेतर्फे झालेल्या डॉ. राम मनोहर लोहिया वक्तृत्व स्पर्धेत आमच्या महाविद्यालयाच्या श्री. आचमारे के. एस. (बी. ए. द्वितीय वर्ष) यांनी भाग घेवून महाविद्यालयास फिरती ढाल मिळवून दिली. गेल्या वर्षापासून वरील फिरती ढाल महाविद्यालयाकडे ठेवण्याचा मान मिळत आहे. वरील स्पर्धा सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी असते. महाविद्यालयातील स्पर्धेचे संयोजन प्रा. रविन्द्र कुलकर्णी यांच्याकडे आहे.

## विद्यार्थी संसद [१९७०-७१]

यंदाच्या शैक्षणिक वर्षासाठी निवडणूका घेवून विद्यार्थ्यांची संसद बनवण्यात आली. निवडणुका गुप्तमतदान पद्धतीने व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडल्या. प्रथम विद्यार्थी प्रतिनिधीच्या निवडणूका झाल्या व त्यातून संसदेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, चिटणीस वगैरे प्रतिनिधी निवडण्यात आले.

सर्वश्री मोतीराम राठोड, विनायक पाटील लक्ष्मण डांगे, गणपत शिंदे, आनंद अंजनीकर, नागनाथ पाटील, इसाकअली काझी, सुरेश तोटावार, लक्ष्मण गोविंदवार, चाकूर, सुरेश कुळकर्णी, माधव तुपदाळे, बाबाराव झरीकर, गंगाधर देगावकर, मोहन करडखेडकर, बल्लेवार, रमेश तोटावार, अरुण कुळकर्णी, कु. सुरेखा मत्सावार व कु. बिना देशमुख वर्ग प्रतिनिधी म्हणून निवडून आले.

खालील विद्यार्थ्यांची संसदेचे पधाधिकारी म्हणून निवड झाली –

अध्यक्ष : श्री. गंगाधर देगावकर (बी. ए. तृतीय व.)
उपाध्यक्ष : श्री. सुरेश कुळकर्णी (बी. एस्सी. द्वि. व.)
चिटणीस : श्री. नागनाथ पाटील (बी. एस्सी. प्र. व.)
सम्मेलन चिटणीस : श्री. मोहन करडखेडकर

## क्रीडा स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी भाग घेतला –

टेबल टेनिस (बीड)

१) आकुलवार जी. वाय. (कॅप्टन)
२) बजाज बी. आर.
३) साल्डेवार प्रल्हाद
४) पाटील एन. के.

(महिला विभाग)

१) कु. देशमुख चंद्रकला (कॅप्टन)
२) कु. राजूरकर शोभा
३) कु. हसीना बेगम

कबड्डी (उदगीर)

१) देगावकर जी. टी. (कॅप्टन)
२) तोटावार सुरेश शंकरराव
३) इप्पतवार व्यंकट
४) देशपांडे बी.
५) भडके व्ही. व्ही.
६) मामीडवार
७) भांगे

व्हॉलीबॉल

१) चितलवार एच्. एम्. (कॅप्टन)
२) आकुलवार जी. वाय.
३) साल्डेवार प्रल्हाद
४) रेनगुंठवार आर. व्ही.
५) कुलकर्णी एस. एम.
६) धुमाळे
७) माशेट्टीवार

क्रीकेट (औरंगाबाद)

१) पोतदार डी. एम. (कॅप्टन)
२) आकुलवार
३) साल्डेवार प्रल्हाद
४) माशेट्टीवार
५) बासरकर सी. आर.
६) कुलकर्णी ए. बी.
७) बासवाडेकर सी. आर.
८) देशमुख पी. बी.
९) अहमद पाशा
१०) देगलूरकर बी.
११) नांदेडकर
१२) विघ्नेश्वर
१३) अनसारी
१४) बजाज बी. आर.
१५) पाटील एन. के.

खो–खो (जालना)

१) एडगीवार पेंटन्ना (कॅप्टन)
२) पोतदार डी. एम.
३) आकुलवार जी. एम.
४) मण्णाजी
५) पत्तेवार
६) पाटील एन. के.
७) मामीडवार
८) वाघमारे एन. एल.
९) तोटावार सुरेश

१०) वडगावे
११) भांगे व्ही.

बुद्धीबळ (बीड)

१) बोरले सुरेश
२) माशेट्टीवार पी. आर.

वैयक्तिक खेळ (औरंगाबाद)

१०० मीटर धावणे –

१) इप्पतवार व्यंकट
२) सोनटक्के

२०० मीटर धावणे –

१) सोनटक्के
२) इप्पतवार

४०० मीटर धावणे –

१) साल्डेवार
२) मण्णाजी

शॉटपुट –

१) शॉटपुट
२) कुलकर्णी एस्. एम्.

थाळीफेक –

१) साल्डेवार
२) इप्पतवार

लांब उडी –

१) रेनगुंठवार आर. व्ही.
२) चिडूरवार अे. बी.

रिले रेस –

१) साल्डेवार
२) चिडूरवार अे बी.
३) इप्पतवार
४) मामीडवार

सामन्यांचे संयोजन व खेळाडूंची निवड प्रा. रामविलास बाहेतीकडे असते.

## एन. सी. सी. (७०–७१)

१९७०–७१ या वर्षात एकूण २०० विद्यार्थ्यांनी एन. सी. सी. प्रशिक्षण घेतले. यंदा हिंगोली येथे झालेल्या वार्षिक प्रशिक्षण शिबिरास २५ कॅडेटस् व एक ऑफिसर गेले होते. १९६९–७० ला झालेल्या "B" सर्टिफिकेट परिक्षेस अकरा कॅडेटस् बसले त्यापैकी नऊ उत्तीर्ण झाले. "C" सर्टिफिकेटस् कॅडेटस् बसले दोघेही उत्तीर्ण झाले. यंदा २३ विद्यार्थी "B" सर्ट परिक्षेस बसले आहेत व "C" ला पांच विद्यार्थी बसले आहेत. मागिलवर्षी नियमीत लष्करी पलटणीत प्रशिक्षणासाठी तीन आठवडे गेले होते. यंदाही दोन विद्यार्थी जाणार आहेत. यंदा ग्रूपकमांडंट ले. कर्नल "श्री बेदी" यांनी कंपनीस भेट दिली व चाललेल्या प्रशिक्षणाबद्दल समाधान व्यक्त केले. यंदा एन. सी. सी. स्टोअरमध्ये शस्त्र ठेवण्यासाठी महाविद्यालयाने १२०० रु. खर्च करुन स्ट्राँगरुम व रायफल ट्रेनिंगसाठी तीन स्टॅन्डस केले त्याचा विद्यार्थ्यांना चांगला फायदा झाला.

## आमच्या प्राध्यापकांचे उल्लेखनीय कार्य : १९७०–७१

### १) प्राचार्य हेमचंद्र धर्माधिकारी :

शंभर मुलांचा श्रमप्रकल्प दीर्घकाल चालवून माहाविद्यालयाच्या वसतीगृहाच्या कामास आकार आणला ★ साधना शिक्षण शुद्धी विशेषांकास ' महाविद्यालये : निर्मिती व विकास ' हा लेख ★ केतकर संशोधन शाळेच्या पत्रिकेत ' प्रा. दयाकृष्ण यांचा सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत ' हा लेख ★ तत्वज्ञान परिषदेत उपस्थिती.

२) प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी :

'अस्वस्थ सूर्यास्त' ( कविता, अभिनव प्रकाशन) व 'दूर गेलेले घर' (कादंबरी मॅजेस्टिक) यांचे प्रकाशन ★ मराठवाडा साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त आलेल्या कवि संमेलनात काव्य वाचन ★ मराठवाडा, आस्मितादर्श, उत्तम या दिवाळी अंकात कविता ★ गणेशोत्सवात व्याख्याने.

३) प्रा. दत्तप्रसन्न साठे :

'क्रांतीकारक कान्हेरे,' 'प्रचलित निवडणूक पद्धती,' 'चंद्रशेखर आझाद' हे लेख प्रकाशित ★ 'शिवचरित्र', 'सुभाषचंद्र बोस : जीवन व कार्य' आणि '१८५७ चे बंड' या विषयावर व्याख्याने.

४) प्रा. गोविंद गोपछडे :

'नागरिकशास्त्र आणि शासनपद्धती' पुस्तकाचे प्रकाशन ★सहकारी ग्राहक संस्था, देगलूरच्या प्रशासक मंडळावर नियुक्ती ★ महाविद्यालयाच्या वसतीगृहाचे यशस्वी संयोजन ★ श्रमदान कार्यात सहभाग.

५) प्रा. माधव कुळकर्णी :

मे-जून १९७० मध्ये मुंबई येथे Career Masters' Course मध्ये उपस्थिती ★ त्या कोर्संच्या अनुषंगाने महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन.

६) प्रा. रघुकृष्ण शेटये :

नांदेड येथे वनस्पतीशास्त्राचे पदव्युत्तर वर्ग ★ 'वनस्पतीचे रोग' (उद्यम) लेख ★ 'सूक्ष्म जंतू" (विज्ञान युग)

७) प्रा. पुरूषोत्तम देशमुख :

Central Institute of English हैद्राबाद येथे Evaluation and Production of Teaching Materials वरील सेमिनारमध्ये विद्यापिठातर्फे निवड Text Books for P. U. C. वर निबंध वाचन.

८) प्रा. श्रीकृष्ण धर्मापुरीकर :

'अभिनव वाणिज्य पद्धती' या पुस्तकास संदर्भ ग्रंथ म्हणून मराठवाडा विद्यापीठाची मान्यता.

९) प्रा. सुग्राम पुल्ले :

'आत्मचरित्रकार नामदेव' (नवभारत) ★ 'संत नामदेव: व्यक्ती व कार्य' या विषयावर देगलूर येथे व्याख्यान ★ मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे झालेल्या 'साहित्य इतिहास परिषदेत' महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व.

१०) प्रा. रामचंद्र घोंगडे :

'योजना व सामजिक न्याय' या विषयावर सावरगाव व वसतीगृहात व्याख्यान ★ महाविद्यालयाच्या नियोजन मंडळातर्फे देगलूर तालुक्यातील स्वातंत्र्योत्तर काळातील सामाजिक व आर्थिक बदल या दृष्टिकोनातून १० गावाचे सर्वेक्षण ★ औरंगाबाद येथे मराठवाडा विद्यापीठातर्फे झालेल्या 'ना. मोहिते श्वेतपत्रिका' या परिसंवादात सहभागी ★ Cooperation वर निबंध वाचन.

११) प्रा. रवीन्द्र कुळकर्णी :

'आंबेडकर : व्यक्ती व कार्य' आणि 'लोकशाहिचे भवितव्य' या विषयावर देगलूर येथे व्याख्याने.

१२) प्रा. रामप्रसाद बळरावत :

'समाजवाद' या नांदेड येथील परिसंवादात महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व ★ महाविद्यालयातील श्रमदानात सक्रीय सहभाग.

### १३) प्रा. रवीन्द्र मनोहर :

तत्वज्ञान परिषद, पुणे येथे महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व ★ श्रमदानात सक्रीय सहभाग ★ N. S. S. या अहमदनगरच्या अभ्यासक्रमासाठी निवड ★ 'समाजवाद' या नांदेड येथील परिसंवादात उपस्थिती ★ 'भारतीय संस्कृती,' 'लोकशाही,' 'भूमी बळकाव मोहीम' या विषयावर सावरगाव, देगलूर येथे भाषणे.'

### १४) प्रा. पंढरीनाथ लांडगे :

'भातशेती' या विषयावर नागपूर आकाशवाणी वरुन भाषण ★, 'महात्मा फुले यांचे समाज परिवर्तन' याविषयावर देगलूर येथे भाषण ★ श्रमदानात सहभाग.

### १५) प्रा. विनायक कठाळे :

महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणखात्यातर्फे यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे Summer School in Mathematics & Physics च्या ६० दिवसांच्या शिबिरात प्राध्यापक म्हणून निवड ★ 'अंकगणितातील गमती जमती' या विषयावर वसतीगृहात भाषणे ★ Modern Mathematics वर वसमतनगर हायस्कूल व भारत हायस्कूल नांदेड येथे भाषणे ★ अ. भा. वि. प. तर्फे झालेल्या "मी हा व्यवसाय का पत्करला ?" या परिसंवादात भाषण ★ अ. भा. वि. प. तर्फे झालेल्या 'मान आवडलेला दिवाळी अंक' या परिसंवादात भाषणे.

### १६) प्रा. सीताराम कुळकर्णी :

'मानव्य विकास विद्यालय देगलूरच्या मदतीसाठी झालेल्या 'प्रेमा तुझा रंग कसा' च्या प्रयोगात भूमिका.

### १७) प्रा. विश्वनाथ येरमुने :

जि. प. हास्कूल भोकर येथे पदार्थ विज्ञान शास्त्रातील 'परमाणू रचना' या विषयावर व्याख्यान व प्रायोगिक मार्गदर्शन.





# प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी

**प्रा.** लक्ष्मीकांत सखाराम तांबोळी, एम्.ए. (प्रथम श्रेणी) उस्मानिया विद्यापीठ, हैद्राबाद. राहणार-जितूर, जि. परभणी, मराठी विभाग प्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर. (जि. नांदेड) हा झाला तांबोळींचा व्यावहारिक परिचय !

तांबोळींचा खरा परिचय हा नाही, कारण यात विशेष काही नाही. त्यांच्या नावाचे - आडनावाचे, उच्च विद्याविभूषित, इतकेच काय जितूरचेही आणि मराठी विषयाचे प्रमुखही पुष्कळ असतील ! तांबोळीही तसे आहेत, पण तेवढेच नाहीत. आणखीही बरेच काही आहेत. प्राध्यापक असल्याने 'बोलणे' हा त्यांचा व्यवसायच आहे. सगळ्यानाच बोलता येते; काहीना 'बोलाय'ची हौस असते; काहीच्या बाबतीत आपण म्हणतो, ' ते बोलले–! ;' बरेच 'बोलके'ही असतात; तर काही बोलभाड आहेत असे आपल्याला दिसते. पण तांबोळींचे 'बोलणे' या एकाही प्रकारचे नाही. प्रसंगोचित आणि उचितसमय तर ते बोलतातच पण कुणाशी कसे आणि कुणाशी कसे बोलायचे हे त्यांना अधिक चांगले समजते. क्रमिक पुस्तकांवर त्यांना बोलावेच लागते. तितक्याच श्रद्धाळूपणे आणि मर्मज्ञतेने ते पौराणिक वाङमयावर आणि आधुनिक मराठी कवितेवरही बोलतात ! जिभेला हाड असते म्हणून ते खऱ्या अर्थाने हाडाचे वक्ते आहेत ! हा त्यांचा व्यावसायिक परिचय झाला !

त्यांच्या विषयी आणखी काही म्हणायचे असेल तर म्हणता येईल की ते लेखक आहेत. कवी आहेत. आतापर्यन्त एका अर्थाने ते फारसे कुणाला माहीत नव्हते. त्यांचे सहकारी, वाचक, संपादक, टीकाकार त्यांचे श्रोते हेच त्यांचे चाहते होते. हे जर सोडले तर ' हुंकार ' ' तवंग ' आणि ' अस्वस्थ सूर्यास्त ' हे त्यांचे संग्रह इतराना क्वचितच माहीत असतील. पण ध्रुवाच्या ताऱ्याने सर्वांचे लक्ष आपल्याकडे वेधून घ्यावे तसे तांबोळीकडे सर्वांचे लक्ष गेले ते त्यांच्या ' दूर गेलेले घर ' मुळे ! त्या कादंबरीला पारितोषिक देऊन महाराष्ट्र शासनाने त्यांचा गौरव केल्यामुळे! तांबोळींची ख्याती एकदम सर्वत्र पसरली. लोकप्रियता मिळाली आहेच, त्यांच्या शिरावर आता राजमान्यतेचा मुकुट चढला ! कविता, लघुकथा लिहिल्या; आता ही कादंबरी झाली. ' प्रादेशिक ' म्हणून जो एक प्रकार वाङमयात आहे, त्याच प्रकारातली ' दूर गेलेले घर.' श्री. ना. पेंडसे, वामन चोरघडे आणि जयवंत दळवी यांनी कोकण वऱ्हाडी आणि काही खास वसाहतींचे चित्र आपल्या कलाकृतीतून घडवले; मराठवाड्याचे परंपरागत, तरीही बाळबोध आणि वैशिष्टयपूर्ण जीवनचित्र तांबोळींनी ' दूर गेलेले घर ' मध्ये रंगवले आहे. जुन्या-नव्यांचा संघर्ष, त्यामुळे होणारी नव्या पिढीची मानसिक आहोताण तांबोळींनी मनोज्ञतेने शब्दांकित केले आहे.

हवेत न तरंगणाऱ्या या माणसाचे हार्दिक अभिनंदन !

लोकशाही समाजवादाचे सच्चे पाईक



जॉर्ज फर्नांडिस महाविद्यालयात

रोखठोक आत्मपरीक्षण



प्राचार्य गो. रा. म्हैसेकर, यशवंत महाविद्यालय, नांदेड, विद्यार्थी संसदेचे उद्घाटन करीत असताना

## महाविद्यालयाचा व्हालीबॉल संच



बसलेले :- १ श्री अकुरवार २ श्री मशेट्टीवार ३ श्री घुमाळे ४ श्री कुळकर्णी
उभे :- १ श्री रेनगुंटवार २ श्री चिंतलवार ३ श्री साल्डेवार

## महाविद्यालयाचा कबड्डी संच



बसलेले :- १ श्री थडके. २ श्री बमापुरे. ३ श्री तोटावार.
उभे :- १ श्री देगावकर. २ श्री मामीडवार.
३ श्री ईप्पनवार. ४ श्री भांगे.

# अभिव्यक्ती

# मराठी विभाग

साहित्य सोनेयाचिया खाणी । उघडवि देशिचिया अक्षोणी ॥
विवेक वेलीची लावणी । हो दे सैंध ॥

: मार्गदर्शक :

*प्रा. सुग्राम पुल्ले*

: संपादक :

*सुभाष देशपांडे*
बी. ए. (तृतीय)

# अपुरे माझे स्वप्न राहिले ---

आर. एस् बसापुरे, बी. ए. (प्र. व.)

रविवारचा दिवस होता संध्याकाळच्या वेळी लता आपल्या आई-वडिलांबरोबर समुद्रावर गेली होती. अथांग सागराच्या लाटांकडे ती पहात होती.. आईशी बोलत होती माधव अशा वेळी तेथें दिसावा अशी लताची तीव्र इच्छा होती. थंडगार वाऱ्याचा स्पर्श सुखद होता. आकाश मार्गातून सूर्यदेव आपला रथ पश्चिमेला नेत होते. संध्यादेवीने त्यांच्या स्वागतासाठी निरनिराळे आकर्षक रंग आकाशात उधळले होते. सूर्यदेव चंद्रदेवाला जागा देण्यासाठी लवकर निघून जाऊ लागले, तारे ही चंद्रदेवाच्या दर्शनासाठी उत्सुक झाले होते, लता हे चेतोहर दृश्य पाहून त्यात रंगून गेली व सहज गुणगुणू लागली 'थंडगार ही हवा, जवळ तू मला हवा .........." आणि काय आश्चर्य माधव अचानक तेथे आला लताने माधवला वाळूवरून येताना पाहिले. आनंद व भीती या दोन्ही भावनाचे तिच्या मनात काहूर माजले. हृदयांत खळबळ निर्माण झाली हया वेळी मात्र त्याच्याशी काहीतरी बोलण्याचा तिने विचार केला. तिने आईकडे भीत भीत नजर टाकली. पण आई क्षितीजावरचे रंग बघण्यात दंग झाली होती. लता हळूच उठून त्याच्याकडे गेली, त्याच्या जवळ जाऊन बसली. तो दोघांच्याही जीवनातील किती महत्वाचा व आनंदाचा क्षण होता ! उत्कट प्रेमभावनेची साक्ष पटविणारा तो क्षण त्या दोघानाही सोनेरी वाटला दोघांच्यातील द्वैत नष्ट झाले होते. लता त्याच्या प्रेमासाठीआतुर झाली होती........

दुसऱ्या दिवशी लता रोजच्या प्रमाणे कॉलेजला जात होती तेवढयात पाठीमागून बोलल्याचा आवाज आल्यामुळे तिनें मागे वळून पहिले. माधव होता. तो आल्या मित्राबरोबर बोलत येत होता. त्याचा मित्र आपल्याला कांही महत्वाचे काम असल्याच सागून निघून गेला.आता माधव लताच्या पाणीदार डोळयातील आपले प्रतिबिंब स्पष्टपणे पाहात होता. ही त्यांची दुसरी भेट होती परंतु दोघांनी आपल्या भावना एकमेकाना नेत्र-पल्लवीने कधीच सांगितल्या होत्या. हृदयातील कंपनामुळे ते एकमेकाशी काही बोलले नव्हते..... मात्र

माधव एक गरीब पण स्वाभिमानी मुलगा होता. लहानपणापासूनच तो आपल्या आईच्या प्रेमाला मुकला होता. घरात त्याचे वडील व लहान दोन भाऊ होते. आईच्या मृत्यूमुळे माधवच्या जीवनात एक पोकळी निर्माण झाली होती. आणि ती आता लताच्या रुपाने भरुन निघणार होती.....

त्याची नजर लतावर गेल्यापासून तो सुद्धा अत्यंत अस्वस्थ झाला होता. वाढत्या वयाबरोबर आपल्या आयुष्यात कसली तरी पोकळी निर्माण झाल्या-सारखे वाटू लागले पण त्याचीनेहमीची वर्तणूक त्यांच्या शांत गंभीर स्वभावाची साक्ष पटवीत होती. शिक्ष-णातील उणीव त्याच्या व्यवहार ज्ञानाने भरुन काढली होती.

माधव बागेत अभ्यास करीत बसला होता. लता मैत्रिणीसह त्या बागेत आली होती. तिचे

सोनेरी किरणासारखे लांबसडक केस सायंकाळच्या व कोवळया उन्हात चकाकत होते. तिची कांतीही अवर्णनीय होती. तिच्या गौरवर्णाला आकाशी रंगाचे पातळ मोठे खुलून दिसत होते. तिच्या बरोबरच्या मैत्रिणीत ती उठून दिसत होती. तिचा बांधा मोठा आकर्षक, वेड लावणारा होता. मैत्रिणीत गप्पागोष्टी करीत असताना तिची दृष्टी सहज मागे वळली. शेजारील झुडुपातून कसली तरी गुणगुण तिच्या कानावर आली. तो आवाज माधवचा होता. तिने तो हृदयात साठवून ठेवला. ती माधवकडे एकटक पाहात होती. स्वप्नातून जागे-केल्याप्रमाणे मैत्रिणीनी तिची समाधी भंग केली. हळूहळू अंधार पडला. लता मैत्रिणीबरोबर चालू लागली. ती नुसतीच चालत होती, स्वत:ला हरवून डोळया समोर माधवचा, आकर्षक, मोहक चेहरा सारखा तरळत होता. ती कोणाशी बोलेना, हसेना. तशा अवस्थेत ती घरी आली. आई-वडिलांच्या आग्रहावरुन तिने दोन घास खाल्ले खरे. पण तिचे मन बेचैन, उदास झाले होते. ती आपल्या खोलीत गेली व विचारात मग्न झाली. ती आई-वडिलांची एकुलती एक मुलग होती. त्यामुळे अतिशय लाडात व श्रीमंतीत वाढलेली. पण तिचे वागणे तिच्या उच्च कुळाला शोभेलसेच होते. आई तिच्या खोलीत जाऊन चौकशी करु लागली. पण ती नीट उत्तरे देत नव्हती. कारण.....

लता-माधवनी एकमेकाना पूर्ण वरले होते रोज एकमेकाना पाहिल्याशिवाय त्यांना चैन पडत नसे. ते एकमेकांची चातकाप्रमाणे वाट पाहात. भेट व्हावयास थोडा जरी वेळ लागला तरी विरहाने ती व्याकूळ होत होती. दोघे आता हृदयाने एकरुप झाली होती. एकमेकांच्या चिंतनात तल्लीन झाली होती. भक्ताने परमेश्वराशी एकरुप व्हावे, त्याप्रमाणे लता आपल्या प्रियकराशी एकरुप झाली होती खऱ्या प्रीतीचा जिवंत साक्षात्कार त्या दोघांना झाला होता. या जगाचा त्याना विसर पडला होता निर्मळ प्रेमाचा अनुभव ती घेत होती. लताची नाजूक कळी आता फुलली होती. त्याच्या स्पर्शाने ती रोमांचित झाली की अधिकच सुन्दर दिसे. तिचे तीक्ष्ण, पाणीदार डोळे, आणि चाफेकळी नाक यांनी माधवला भारुन टाकले होते. त्यांच्या मिलनास धवल चंद्रकोर साक्ष होती. त्यांचे येणेजाणे हळूहळू वाढले. लताच्या वडिलांची याला पूर्णपणे संमती होती. त्या दोघाना एकत्र पाहून आपले कर्तव्य संपल्याची जाणीव आई-वडिलाना होत होती. त्या दोघांचा जोडा दृष्ट लागण्या सारखाच होता....

पण माधवचे वडील त्यांच्या मित्राच्या वचनात गुरफटले होते. त्यांच्या मित्राला एक मुलगी होती. तिच्या लहानपणापासूनच दोघाच्या आई-वडिलांनी एकमेकांना वचने दिली होती. सुमन मोठी झाल्यामुळे तिच्या आई-वडिलांचे पत्र माधवच्या वडिलाना आले. माधवला याची तिळमात्रसुद्धा कल्पना नव्हती. माधवच्या आईने मरताना त्याच्या वडलांकडून वचन घेऊन " माधवचे लग्न सुमनशीच करा " असे सांगितले होते. आणि आता सुमनचे वडील माधवकडे त्याच्या वडिलाशी बोलणी करण्यासाठी येणार होते. माधवने या गोष्टीला नकार दिला. परंतु वडिलांचे रुक्ष तांबडे डोळे बघितल्यावर त्याचे कांही चालेना. त्याने वडिलाना अनेक विनवण्या केल्या. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. अखेर लग्न ठरले. आता लताला काय सांगावे असा मोठा प्रश्न त्याच्या पुढे उभा राहिला. लताला आता हे तोंड कसे दाखवावे ? आपण तिच्या आयुष्याचा सत्यानाश केला, ही बोचणी त्याच्या जिवाला लागली. आपणच ती कळी खुलविली व तिचे निर्माल्य होण्यासही आपणच कारण ठरलो. त्याचे डोके बधीर झाले. जेवण-खाण त्याला सुचेना झोप उडाली. शेवटी तो लताकडे गेला व "आपण पळून जाऊ या असे तिला म्हणाला. पण लताला हे योग्य वाटेना. ती म्हणाली " माधव हे आपल्याला, आपल्या कुळाला शोभणार नाही..."

समाज आपल्या आई–वडिलाना दोषी ठरविल ही कल्पनाच तिला असह्य झाली. " आपल्या मुळे आई–वडिलांच्या नावाला, आपल्या कुळाला मोठा कलंक लागेल व तो कलंक कधीही धुवून निघणार नाही" इत्यादी विचारानी तिच्या डोक्यात थैमान घातले.

त्या दोघांनी कित्येक सुखस्वप्ने रंगविली होती त्याचे प्रेम निस्सीम होते. निरागस, दैवी प्रेमाचा साक्षात्कार दर्शविणारे होते. परंतु सुखस्वप्ने रंगात आलेली असतानाच पारध्याने बाण मारला... लता माधवचे सुख परमेश्वराला बघवले नाही. त्यांचा अनुरुप जोडा त्या विधात्याला बघवला नाही, त्यानेच पारधी निर्माण करुन क्रौंच पक्ष्यांची ताटातूट केली देव इतके बरे निष्ठूर झाले ? त्यांच्या पवित्र निस्तीम प्रेमाची देवाने कदर केली नाही. त्यांच्या प्रेमात, सुखात विष कालविले.

"स्वप्नातल्या फुलांचा होईल काय हार ?" असे म्हणत माधव लताच्या खोलीत आला. हे त्याचे शेवटचे, अगदी शेवटचे भेटणे होते. एकमेकांना ते पुन्हा भेटू शकणार नव्हते. त्यांची सुखस्वप्ने मातीमोल झाली होती. जीवनातील ध्येय, आशा, आनंद सर्वच लोप पावले होते. त्यांचे प्रेम क्षणिक स्वपनच होते. लता पलंगावरुन ऊठली. अतिशय आवेग ने तिने माधवला मिठी मारली. त्याच्या बाहुपाशात ती प्रीतीची ज्योत मालवून गेली.

□ □

☎ ८८

दिलीप ड्रेसेस्

रेडीमेड क्लॉथ स्टोअर्स

देगलूर, जि. नांदेड

लेटेस्ट फॅशनचे तयार कपडे

व

होजिअरीचे प्रमुख व्यापारी

– ब्रँच –

विठ्ठल इरन्ना मोतेवार

आणि

पापागोंड मोगलागोंड मदनूरकर

कमिशन एजंट, देगलूर.

# अस्से दिवस नव्हते ग बाओी-!

विजय गंगाधर वाकडे बी. ए. (द्वि. व.)

( साठी ओलांडलेल्या आजीबाई धार्मिक सभा-रंभा करिता मंदिरात.........?

अं..... काय सखूबाई–काय हा मेला उकाडा...नाही तरी हल्ली कांहीच सोसवत नाही गेले हो ते सगळे दिवस...! ते दिवस आता आठवले किनई मला तर बाई मी चक्क सासुरवाशीण सून आहे असे वाटते...काय ते दिवस केवढा त्या जळचा–मेल्या सारखांचा जाच. बाई-बाई आपली तर मज्जाल नव्हती फिरुन बोलण्याची··· अन् ह्या आताच्या सुना ? अहो त्या सुना आहेत कां सास्वा......! काय अेक अेक तोऱ्यात राहतात कुणाचा मान ..नको...मरातब नको. धाक नको धगारा नको...सुटल्या आपल्या मोकाट...ह्या शिक–लेल्याना ? म्हणें पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून काम करणार...छी: छी: केवढा हा भ्रष्टाचार... या मुलींना ताळ तंत्रच नाही. तिन्ही त्रिकाळ हस–तात काय. खिदळतात काय. सारा अजबच प्रकार–! ते आपले दिवस असें नव्हतं गऽबाओी...! ह्या आज कालच्या मूलींना नटण्या–मुरडण्या शिवाय दुसर येतच काय ? पावडर काय फासतात......काजळ–टिकली ......झालंच तर ते ओठाचं......! अेक काय सगळं सोंगच–! आता तुम्हीच सांगा सखूबाओी आपल्या जमान्यात हे असं होतं का ?

आणि हल्लीचे हे नवरे......! काय लाजा आहेत हो त्यांच्यात......ह्यांच्या सगळ्या वेसणी बायकांच्या हातात......शेळपट मेले...... ¡ आपल्या जमान्यात दादल्या कडे नुसता डोळावर करुन बघ-ण्याची हिंमत नव्हती. अन् ह्या हल्लीच्या पोरी–? मारे अेकमेकांच्या डोळयात डोळे घालून तासन्-तास गप्पा छाटीत बसतात......आमचेही नवरेच होते म्हणावं–पण असं नाही बाई......!

जाअू द्या...... जमाना पालटला......आपलं तरी काय न्हायलय् म्हणा......अर्ध्या–गोवऱ्या गेल्या पुढे–!! कोण बेबी ऽ ! काय ग झालं का दर्शन–?

बस् की थोडी-? एवढया अुन्हात काय आहे-? ऐकलं का सखूबाओी–आमची बेबी काय म्हणते ? मी म्हणें, हिच्या बरोबर त्या व्यंकटेश टॉकीजला लागलेल्या सिनेमाला जावं–? आता कमाल झाली बाओी हिची सिनेमापाहण्याचे का आपले हे दिवस ? भारीच हट्टी बाई ही–! म्हणे त्या 'सन्नो का सौदा-गरात' कोण हेमामालिनी खूपच छान काम करते–! अग पण......... आता काय कराव बाई–पंचाईत आली......चला पोरीबाळींचा हट्ट आहे ....जाअून यावं ......! बरं कां सखूबाई...... जरासा अेका आहाराचा तबाखू असेल तर द्या ...... हो विसरलेच अुद्या येतांना जरा कापूस आणा वातीला–! –बरं येत्या व्हा–!!

□□

# गुजरात विद्यापीठाला भेट ---
## 0000 एक हिरवे स्मरण

– देविदास मंदाडे

गगनाशी स्पर्धा करणाऱ्या त्या उंच उंच इमारतींना मागे टाकीत रस्त्यावरील अलोट गर्दीतून आमची टॅक्सी पुढे जात होती. सूर्य नुकताच मावळतीला गेला असल्याने हिवाळी गारवा जगावर आपले साम्राज्य स्थापू लागला होता. तरीही त्या गारव्यात शहर पाहतां पाहता आम्ही एकदम दाट जंगलात आल्याचा आम्हाला भास झाला, प्रशांत अशा वातावरणात येऊन पोचलो. एका आश्रमात आल्याचे आम्हाला जाणवले, व पुढे जे आम्हाला अनुभावाला आले ते आमच्या कल्पनेंपेक्षा किती तरी वेगळे होते.

मराठवाडा विद्यापीठातर्फे गुजरात विद्यापीठाला भेट द्यायला जायचं म्हणजे तेथील विद्यापीठ पहायचं तेथील शिक्षण प्रेमी मंडळाशी चर्चा करा य ची. समवयस्क मित्र मिळवायचे, त्यांच्याशी खूप गप्पा करायच्या व गुजरात - महाराष्ट्र स्नेहसंबंध प्रस्थापित केल्याच्या खुशीतच तेथील मित्रमंडळींचा निरोप घ्यायचा. अशी आमची कल्पना होती, पण आम्ही जेव्हां टॅक्सीतून खाली उतरलो तेव्हां ती फोल ठरल्याचे आम्हाला कळले. व आम्हा सर्वांना तेथे एक वेगळेच शैक्षणिक विश्व निर्माण होत असल्याचे दिसले. सभोवार पाहिले असता त्या आवारात इमारतींचा नोकझोक कुठेच दिसला नाही. तिथल्या महामात्रानी Registrar म्हटल्याप्रमाणें गुजरात विद्यापीठ ही एक छोटीशी प्रयोग शाळा आहे. व येथे जीवन जगण्यासाठी योग्य असे 'कामगार' तयार केले जातात. याची आम्हाला बरीच प्रचीती आली.

१९२० साली भारत देश इंग्रजांच्या आधिपत्याखाली असतांना महात्मा गांधीनी या विद्यापीठाची स्थापना केली. इंग्रजलोक त्यावेळी भारतीय शिक्षण संस्थांना कारकून काढण्याचा कारखाना" या पलीकडे जाऊन पहात नसत. तर गांधीजीनी हे विद्यापीठ केवळ समाजसेवक बनविणे या उद्देशाने काढले. त्यामुळे इंग्रजी अमलात या विद्यापीठास अनेक संकटाना तोंड द्यावे लागले. मध्येच बंदही ठेवावे लागले. व येथील लोकांच्या जिद्दीमुळेच या विद्यापीठाने मूळ धरले.

गांधीजींनी हे विद्यापीठ स्थापण्याचा उद्देश त्यांच्याच शद्वात सांगावयाचा झाल्यास "शिक्षाकी मेरी योजनामे हाथ अक्षर लिखना सिखनेके पहले औजार चलाना सिखेंगे ! हाथका काम सारी योजनाओं का केंद्रबिंदु होगा ! "

विद्यापीठात राहणाऱ्या सगळ्याच विद्यार्थ्यांना वसतीगृहातंच रहावे लागते सुमारे चारशे ते पांचशे विद्यार्थ्यांचं हे विद्यापीठ स्वतंत्र रित्या चालविले जाते. या विद्यापीठात म. दे. महाविद्यालय नावाचे एकच महाविद्यालय आहे. अन्य कुठल्याच महाविद्यालयाचा संबंध नाही. येथील प्रत्येक विद्यार्थ्याला तीन वर्षांत

बत्तीस विषयांची परीक्षा द्यावी लागते. त्याबरोबरच सुतारकाम शेतीकाम, सूतकताई व हातमाग चालविणे यातही तरबेज व्हावे लागते व त्याचे पण गुण मिळतात दुसरी गोष्ट ही की येथील विद्यार्थ्यांना स्वतःचे काम स्वतः करुन दुसऱ्यांना मदत करण्याची सवय लावली जाते त्यासाठी विद्यापीठाच्या व्यतिरिक्त वेळात त्यांना गुंतवून ठेवतात. स्वयंपाक करण्यापासून ते स्वच्छता राखण्यापर्यंतची सगळीच कामे विद्यार्थी करीत असतात. तेथे विद्यार्थी संसदेतील विद्यार्थ्यांना स्वच्छतामंत्री भोजनमंत्री अशा प्रकारची खाती दिली जातात त्यांचा फक्त एक जनरल सेक्रेटरी असतो. सर्व विद्यार्थ्यांना गणवेश दिलेला आहे विद्यापीठातील सर्वलोक जाणीव पूर्वक खादी वापरतात.

विद्यापीठात गेल्या बरोबर बेहरे नांवाच्या एका वृद्ध गृहस्थांची व आमची भेट झाली. ते चांगल्या प्रकारे मराठी बोलतात. त्यानी आम्हाला प्रथम गुजरातचे काय पहायला आलात? हा प्रश्न केला त्यांचा रोख हा होता की शाही जीवन की, दारिद्र्य? पुढे त्यांनी गांधीजींच्या कार्याची थोडक्यात माहिती सांगीतली.

दुसऱ्यादिवशी सकाळी आम्हाला कार्यक्रमपत्रिका देण्यात आली. आम्हाला तिथले कांहीच माहीत नसल्याने त्यादिवशी तरी आम्ही ते मान्य करुन टाकले सकाळीच तेथील एका प्राध्यापकानी विद्यापीठाची प्रास्ताविक माहिती आम्हाला दिली त्यानी थोडक्यात असे सांगितलें. महात्माजीचा ज्याप्रमाणें कामगार तयार करण्याचा शिक्षणाचा दृष्टीकोण होता त्याच प्रमाणें इंग्रजानी जी शिक्षणपद्धती चालू केली आहे ती मुळे इंग्रज भारतात जास्तकाळ राहू शकले. त्यांना प्रतिकूल अशी ही एकमेव संस्था गांधीनी चालू केली. आचार्य कृपलानी, काकासाहेब कालेलकर यांच्या सारख्या थोर व्यक्ती आचार्य म्हणून या संस्थेला लाभल्या. आजही संस्थेतून बाहेर पडणारे नव्वद प्रतिशत विद्यार्थी खेड्यातून कार्य करतात असे प्रा पटेल यानी प्रास्ताविक भाषणात सांगितले. ते पुढे म्हणाले की "आमचा विद्यार्थात व आमच्यातील निर्माण झालेले सुप्तनाते आहे. त्यानी हे ही सांगितले की आमच्या संस्थेतून बाहेर गेलेला एकही विद्यार्थी बेकार नाही व पुढे ही राहणार नाही. कारण आम्ही त्यांना त्यांचा रोजगार मिळवून देतो. अंग मेहनतीच्या असल्याही कामात आमचा विद्यार्थी मागे रहाणार नाही याचा अनुभव नुकतीच नर्मदेच्या पूरग्रस्तांना विद्यार्थ्यांनी केलेली मदत व तेथील लोकांचे अभिप्राय असल्याचे त्यानी सांगितले.

तेथे आम्हाला पश्चिम भारतातील सगळयात मोठे असलेले ग्रंथालय दाखवण्यात आले, जवळ जवळ दीड दोन लाख ग्रंथांनी संपन्न असे हे ग्रंथालय आहे. विशेषतः जुन्या ग्रंथांचा भरणा जास्त असल्याचे आम्हास दिसून आले या ग्रंथालयाचा उपयोग गुजरातमधील कोणतीही व्यक्ती करु शकते. ग्रंथाविषयी माहिती सांगताना महामात्र असे म्हणाले की, " गांधीजी चिक्कू होते पण एखादे पुस्तक कुठूनही मागवयाचे झाल्यात ते पाण्यासारखा पैसा खर्च करीत व पुस्तक लौकरात लौकर मिळण्याची व्यवस्था करीत."

तेथील महामात्रानी आपले परदेशातील अनुभव अत्यंत मोकळया मनाने व रेखीवपणे सांगितले. आम्ही त्याना खादीच्या आवश्यकतेबद्दल खूपच विचारले. पण त्यानी त्यांची सहज व सफाईदारपणें उत्तरे देऊन आम्हाला अबोल केले. खादीचे महत्व सांगताना ते म्हणाले चरखा हे एकेकाळी श्रमिक जनतेचे प्रतीक म्हणून संबोधण्यात येत होते पण आज ते नुसते प्रतीकच नसून लाखो लोकांना रोजगार देणारे साधन आहे ते एक प्रकारचे छोटेसे यंत्रच आहे चरखा वापरल्याने जगाच्या दृष्टीने आपण मागासलेले ठरु असे म्हणणे चूक आहे, असे त्यानी सांगितले ती आपल्या देशाची गरज आहे. आपली आर्थिक झेपच तितकी आहे यंत्र युगातील यंत्रापर्यंत जाण्याचे त्राण भारतात नाही. उंच आकाशाशी स्पर्धा करून आत्मघात करुन घेण्या ऐवजी आहे त्यातच सुधारणा घडवणे बरे. आणि नावें सारख्या अनेक राष्ट्रातही चरखा वापरला जातो. तो केवळ भारतातच आहे असे समजण्याचे कारण नाही. 'तुमच्या विद्यापीठात शिक्षण घेतलेला विद्यार्थी हा बाहेरील जगाशी स्पर्धा करु शकणार नाही. तो गुजरातच्या बाहेरच पडू शकणार नाही. कारण येथे शिक्षण एकंदर गुजराती माध्यमात

दिले जाते व दुसरे म्हणजे विद्यापीठात तांत्रिक शिक्षण दिले जात नाही किंवा सायन्स, कॉमर्स हे विभाग पण नाहीत. व आपण तसे प्रयत्नही केल्याचे आढळत नाही. असे आमच्यापैकी कुणी तरी म्हटल्यावर ते म्हणाले की 'आम्ही कांहीच न करण्यापेक्षा काही तरी करीत आहोत, एवढेच आम्हाला बरे वाटते.

शिक्षणाच्या माध्यमाविषयी विचारले असता बऱ्याच लोकांनी आम्हाला असे सांगितले की, शिक्षण हे प्रत्येकाला आपल्याच भाषेत दिले पाहिजे. व त्यासाठी गुजरात विद्यापीठ १९२० सालापासून प्रयत्न करीत आहे. इंग्रजी शिकून इंग्रजी 'बाबूच' जास्त प्रमाणात बनल्याचा अनुभव त्यांनी सांगीतला. त्यापेक्षा भारतीयच बरे. व इतर देशात जे नवीन शोध लागले ते कांही इंग्रजी शिकल्यानेच लागले असे म्हणता येत नाही, त्यानी सांगीतले व चीन, जर्मन, वगैरे राष्ट्रांची उदाहरणे पण दिली. परीक्षापद्धती ही मुळातच चुकीची आहे व विद्यापीठ लौकरच ती बंद करणार असल्याचेही सांगीतले.

विद्यापीठातील कांही प्राध्यापकांच्या व विद्यार्थ्यांच्या बरोबर आम्ही तेथील झोपडपट्टीतून हिंडलो. तेथील लोक अतिशय उद्योगी आहेत त्याना गुन्हेगार जमातीमधील समजल्या जाते. बहुत करुन ते फेरीवाले हमाली, अशा प्रकारचे धंदे करतात, झोपडपट्टीतून खादी अहीर, हरिजन, बाद्री, चुनारा इ. लोक रहातात. आमच्या बरोबर आम्हाला झोपडपट्टी दाखवायास आलेल्या प्रा. कोकीलाबेन झरीवाला यानी तेथील आदिवासी लोकांची बरीच माहिती दिली. झोपडपट्टीशी त्यांचा बराच परिचय असल्याचे दिसून आले. झोपडपट्टीतील स्त्रियांना शिवण काम भरतकाम इ शिकवण्याचे काम विद्यापीठातील विद्यार्थीनी करतात. विद्यापीठाच्या लोकांचे झोपडपट्टीवाल्यांशी इतके घनिष्ट संबंध आहेत की, आपल्या अडचणी ते विद्यापीठात नमूद करतात व विद्यापीठ त्यांच्या अडचणी दूर करण्यासाठी सरकारशी झगडते एक प्रकरण कोर्टातही गेल्याचे समजते. यावरुन विद्यापीठातील लोक किती जागरुक व क्रियाशील आहेत हे आमच्या लक्षात आले.

विद्यार्थ्यांत व प्राध्यापकात आपुलकीचे नाते आहे. प्राचार्य पण विद्यार्थ्यांच्या अडचणीकडे लक्ष देतात. विद्यार्थ्यांना आपल्या मागण्यासाठी झगडण्याचे प्रसंग क्वचितच येतात. कारण विद्यार्थी पण समंजस आहेत. मागण्या जर मान्य होत नसतील तर विद्यार्थी मोर्चा न काढता उपोषण करतात व आपला चरखा चालू ठेवतात आणि तेथील संबंधित लोक तावडतोब तिकडे लक्ष पुरवतात व विद्यार्थ्यांना उगाच नाराज न करण्याचा प्रयत्न केला जातो. कारण त्यांचा विद्यार्थ्यांवर फारच मोठा विश्वास आहे. विद्यापीठातील मंडळाच्या निवडणुका आपल्या स्थाणेच होतात. प्रत्येक वर्गातून विद्यार्थीनीसाठी एक राखीव जागा आहे.

संशोधनार निबंध लिहिण्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थी हा खेड्यात जाऊन तेथील लोकजीवनाचा एखादा भाग निवडतो व आपले संबंध तेथील लोकाशी प्रस्थापित करुन माहिती मिळवतो व प्रबंध लिहितो. याचा शासनास पण बराच उपयोग होत असतो. भारतातील दुसऱ्या प्रकारचे आदिवासी संशोधन केंद्र आम्हाला दाखवण्यांत आले. त्या ठिकाणी भारतात राहणाऱ्या मागास-वर्गीयांच्या जीवनावरील एक सिनेमा दाखवण्यांत येतो. त्यावरुन मागासवर्गीय लोकांचे राहणीमान इत्यादीचा कल्पना येते. तेथे प्रदर्शनात पळचु वाडलो गळमाझोना, हामडी इ. नांवाचे दागिने ठेवण्यांत आली होती. मागास वर्गासाठी जन्मभर ज्यानी प्रयत्न केले अशा ठक्करबाप्पा व इतर कार्यकर्त्यांची माहिती तेथे आपणास मिळते. विद्यार्थ्यांना कामे करण्यासाठी तेथे विद्यापीठाचे एक वर्कशॉप आहे. विद्यार्थी तेथे वेगवेगळी कामे करतात सुतारकाम, हातमाग यासारखी कामे आम्ही पण करुन पाहिलो. विद्यार्थी हातमागावर सतरंज्या विणतात व आपल्या फीची व्यवस्था करतात मुली सुतारकामाऐवजी शिवणकाम करतात.

प्रख्यत लेखक, 'ज्ञानपीठ' पुरस्काराचे मानकरी व गुजरात विद्यापीठाचे कुलगुरु श्री उमाशंकर जोशी यांच्याशी आमची भेट घडवून आणली गेली. चहापानाच्या वेळी शिक्षणपद्धती, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राज यांचा राजीनामा इत्यादी विषय निघाले. शिक्षण

पद्धतीत आम्हा शिक्षार्थी नसून परीक्षार्थी आहोत असे त्यानी सांगीतले. यातच डॉ. राज यांच्या राजीनाम्याची शोधल्यास सबंध सापडले. तसेच विद्यापीठाची जडण-घडण व अध्यापकांचे असहकार्यही कारणीभूत असावे, असे ही म्हणाले.

विद्यापीठातील विद्यार्थी व विद्यार्थीनी मिळून आमच्यासाठी मनोरंजनाचा कार्यक्रम ठेवला होता. त्यातील लहान मुला मुलींचे नृत्य, व कॉलेज मधील मुलीनी दाखवलेले घागरा-नृत्य, आम्हा सर्वांनाच आवडले. आमच्यापैकी कांही मुलानी पण करमणुकी-च्या कार्यक्रमात भाग घेतला होता. त्यात दत्ता चौघुले या विद्यार्थ्याचे बासरीवादन आवडल्यामुळे त्याला खूपवेळा 'वन्स मोअर' मिळाले.

विद्यापीठातील मित्रमंडळी बरोबर आम्ही तेथील ऐतिहासिक स्थळे पाहिली. प्रामुख्याने आम्ही साबरमती, राजभुवन, कांकरियाधरण, जुनी मंदिरे, मशिदी कांही लेण्याचे उत्कृष्ट नमुने पाहिले. त्यात शैक्षणिक क्षेत्रांचा पण समावेश होतो. मुलांच्या दुप्पट मुली आसल्याने कॉमर्स कॉलेज तसेच अहमदाबादेतील मराठी भाषिकांचे एकमेव ठिकाण महाराष्ट्र हायस्कूल पण पाहिले. तसेच कांकरीयाचे चिडियाघर पाहिले.

गुजरात प्रांतात आम्हाला जेवढे म्हणून मराठी भाषिक भेटले त्यात स्मरणीय अशी भेट म्हणजे गुजरातचे पंचायत मंत्री श्री ठाकुरभाई देसई यांची, ठाकुरभाईना मराठी चांगल्या प्रकारे बोलता येते. त्यांच्याबरोबर बरीच चर्चा झाली. ठाकुरभाई हे याच विद्यापीठाचे विद्यार्थी होत म्हणून त्यांचे व विद्यापीठाचे नाते अतूट आहे. समाजवाद हा भारतात फक्त कम्यु-निस्टांचाच आहे. तो इंडिकेट व सिंडीकेटच्या कसल्याही कार्यातून प्रतीत होत नाही असे त्यानी सांगीले. विद्यार्थ्यांचे विद्यापीठात प्रतिनिधित्व असावे किंवा नाही या प्रश्नाला तर त्यानी धुडकावूनच लावले. ते म्हणाले विद्यापीठ म्हणजे कांही व्यापारी संस्था नाही.

गुजरातचे राज्यपाल श्री मन नारायण यांच्या मुलाखातीत त्यानी आमच्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरां-पेक्षा त्यांच्या शांत वृतीने व बोलण्याच्या ढकबीनेच आम्ही प्रभावीत झालो, त्यानी आपली स्वत:ची दोन पुस्तके मराठवाडा विद्यापीठाला व आम्हा सर्वांना भेट म्हणून दिली.

गांधीजींच्या पश्चात त्यांच्या अपुऱ्या इच्छा पूर्ण करणारे हे विद्यापीठ पाहून खरोखरच धन्य वाटले. कारण महाराष्ट्रात गांधीना लोक काय मानीत होते व काय मानतात हे आम्ही पाहिलेच आहे. ○ ○ ○

न्यु गेम्स सेंटर

हायक्लास स्पोर्टस् गुड्ससाठी

सुभाष रोड, नांदेड.

Post Box : 50 Phone : 612

Write or Visit for your requirements in books of Science, Arts, Commerce, Law Education, Medical Colleges and English Pocket Books

BOOK CENTRE

Shivaji Road, NANDED.

(S. C. Rly.)

# सार्थक ..........!

– कु. हेमलता पांडे
बी. ए. (तृतीय)

सुनीती त्यावेळेस आठवीत शिकत होती. एके दिवशी ती शाळेत पाणी पीत असतांना व्हारांड्यात एक मुलगी व एक गृहस्थ उभे असलेले तिला दिसले. त्या मुलीने सुनीतीला विचारले, ' हेडमास्तरांचे ऑफीस कुठे आहे ? मला या शाळेत प्रवेश घ्यायचाय. " सुनीतीनें विचारले, 'तू कोणत्या वर्गात प्रवेश घेणार आहेस ? " त्यावेळेस त्यामुलीनें उत्तर दिले, " आठवीत ". " अय्या मी पण आठव्याच वर्गात आहे. " असे म्हणत सुनीतीने त्यामुलीला ऑफीस दाखवले आणि सुनीती वर्गात गेली.

दुसऱ्याच तासाला ती मुलगी सुनीतीच्या वर्गात आली. सुनीतीने तिला आपल्याजवळ जागा दिली. सर्व मुलींनी तिचा परिचय करुन घेतला तिने आपले नांव सुमती आहें असे सांगितले. सर्व मुलीत आपण सुनीतीशीच जास्त मैत्री करावी असे सुमतीला वाटले तेव्हा पासून सुनीती व सुमती जिवा भावाच्या मैत्रिणी बनल्या.

आठवीपासून सुनीती व सुमती एकत्रच अभ्यास करीत. एकत्रच फिरायला जात. सिनेमालाही दोघी मिळूनच जात. दोघींनाही एकमेकी शिवाय करमत नसे. शेवटी मॅट्रीकमध्ये दोघीही सेकंड क्लास पास झाल्या.

यापुढे आपली मैत्री संपते की काय असे सुमतीला वाटू लागले. कारण घरची गरीब परिस्थिती असल्याने सुमतीला कॉलेजची पायरी चढता आली नाही. सुनीतीला मात्र तिच्या वडिलानी कॉलेजात घातले. आपल्या बरोबरची मैत्रीण कॉलेजला जाते आणि आपल्याला मात्र घरी बसावे लागते याचे सुमतीला राहून राहून वाईट वाटत असे. सुनीती आता आपल्याशी पूर्वीसारखे बोलणार नाही अशी तिला शंका आली. पण सुनीतीचा स्वभावच वेगळा होता. ती म्हणायची, " अग सुमे, तूं कॉलेजला आली नाहीस म्हणून काय झालं, मला तुझ्याशिवाय करमतच नाही, मैत्रीच नातचं वेगळं असतं एकदा हे नातं जडल की ते कधी तुटतच नाही. उलट माझ्या मैत्रणीसाठी मी वाटेल तो त्याग करायला तयार असेन! "

खरेच ! सुनीती जरी कॉलेजला जात होती तरी तिला गर्व नव्हता. ती नेहमी सुमतीला कॉलेज-मधल्या गमती सांगून तिचे मनोरंजन करीत असे. त्यामुळे सुमतीला आपण कॉलेजला जात नाही याचे दुःख वाटेनासे झाले उलट आपणही सुनीतीबरोबर कॉलेजलाच जातो असा तिला भास होई.

पाहता पाहता सुनीतीने बी. ए. ची डिग्री मिळवली. तिला चांगली नौकरी पण मिळाली. पण सुमतीचे वडील मात्र सुमतीच्या लग्नाचा विचार करु लागले. सुमतीसाठी अनेक स्थळे पाहिली. सुमती दिसायला सर्वसाधारण होती त्यामुळे कांही स्थळे

गोत्रावरुन जात. काहींच्यातून नापसंती दर्शवली जात असे काही स्थळे पैशावरुन जात. कारण सुमतीच्या वडिलांची परिस्थितीच गरीब होती. त्यामुळे सुमतीचे वडील, अण्णा नेहमी काळजीतच असत.

एके दिवशी सुमती सुनीतीकडे आली दोघी बागेत गप्पा मारत बसल्या होत्या. मध्येच सुनीती सुमतीला म्हणाली, 'सुमे, आज तू वेगळयाच मूडमध्ये दिसतेस, काल परवा कुणी आलं होतं का? तू मला कांहीच कळू देत नाहीस."

"हो, ग, आठ दिवसाखालीच एक मुलगा आला होता तो चांगला आहे अण्णांना पण ते स्थळ आवडलं आहे एवढच नाही तर वरपक्षाचा 'पसंत' म्हणून निरोपही आला आहे ,, . . . सुमती सांगत होती. "वा! सुमे मग तर फारच छान झालं का, ग या बद्दल मात्र तू मला पत्ताच लागू दिला नाहीस खरं तर तू माझ्यापासून अशा गोष्टी लपवूच नयेस बरं जाऊ दे. हे स्थळ जमणार म्हणा की ! ... सुनीती.

"अग, दोन दिवसाखाली वरपक्षाची व अण्णाची बोलणी पण झाली पण त्यात काहीं फिसकटलें आहे असे मला अण्णांच्या चेहऱ्यावरुन दिसतंय. पण या बाबतीत अण्णा काहीच म्हणाले नाहीत. खरंच! सुनीती लग्नाच्या बाबतीत तरी मला देव कध्हा साथ देणार आहे कुणास ठाऊक ... . . .! सुमती.

'जाऊ दे सुमे, तू कशाला काळजी करतेस. जमेल केव्हा तरी. आपण सारखा त्या गोष्टीचा विचार कशाला करावा? आपल्या सारख्या मुलीने नेहमी हसतखेळत असावं असं मला वाटतं नेहमी विचारमय असणाऱ्या मुली मला आवडत नाहीत. अग, पण आपण किती वेळ बागेत बसलो. बघ संध्याकाळ झाली आहे. चल आपण चहा घेव नंतर तू घरी जा. ,, सुनीतीच्या घरी चहा पिऊन सुमती आपल्या घरी गेली.

दुसरे दिवशी सुमतीच्या लग्नाबद्दल निश्चित काय ठरले हे अण्णांना विचारण्यासाठी सुनीती सुमतिच्या घरी गेली. अण्णा बैठकीत बसले होते. सुनीतीला पाहून अण्णा म्हणाले "ये सुनीती ,, सुनीती बैठकीत जाऊन बसली आणि अण्णाला म्हणाली, "सुमीचं लग्न जमलं म्हणे. ,, यावर अण्णा म्हणाले "अग अजून निश्चित नाही परवाच आमची बोलणी झाली. पण वरपक्षाच्या व आमच्या बोलण्यात जरा रुपयाचा फरक येत आहे मी त्यांना सांगितलं की, मी आठ दिवसानी विचार करुन सांगतो. पण माझ्या मनात हे स्थळ जमवायचं आहे थोडक्याकरीता आपण तरी मागे पुढे कशाला पहायचं असा विचार मी करतोच. पण मी आहे गरीब. बघ आता होतं ते. नाही तरी सुमीच नशिबच खडतरच आहे. ,, अण्णांचे हे बोलणे ऐकुण सुनीती जरा गंभीरच झाली. थोडा वेळ विचार करुन सुनीती म्हणाली "अण्णा, किती फरक पडतो, तुमच्या आणि त्यांच्या रकमेत ? ,, "पाचशेय. ,, "मग मी तेवढयाची सोय करीन. पण एका अटीवर तुम्ही मला काहीही परत फेड करायची नाही. सुमतीच हे लग्न जुळवून टाका. ,,

"अग, तू वेडी तर नाहीस ना? तुझ्या सारख्या पोरीचे पैसे मी तसे कसे घेऊ. मला ते घेता येणार नाहीत. जगात खप गरीब माणसं असतात, म्हणून त्यांच्या मुली लग्नाविना थोडयाच राहतात? जमेल आज नाही उद्या, एवढेच. .. ,, अण्णा, सुनीती म्हणाली, "अण्णा मी आणि सुमती जिवाभावाच्या मैत्रिणी. आणि मी जर माझ्या मैत्रिणीच्या अडचणीच्या प्रसंगी मदत नाही केली तर आमच्या मैत्रीला अर्थच काय राहिला? आणि मी जे पैसे देते ते काही दुसऱ्याचे आणून थोडेच देत आहे. हे माझ्या नोकरीचेच तर आहेत. आणि मी ते सुमीच्या लग्नाला दिले तर काय हरकत आहे दोन महिने मला नोकरी उशीरा लागली असेच मी समजेन. ,,

सुनीती हे बोलणे एकूण अण्णा भारावून गेले. सुनीतीच्या आग्रहावातर त्यांना लग्नाची बोलणी पक्की केली. आणि त्यानाही ते जुळवायचे होतेच. सुनीतीला याबद्दल फार आनंद झाला.

अण्णानी ही गोष्ट सुमतीला कळवली. हे एकून सुमतीच्या डोळयात पाणी आले. तिने लगेच सुनीतीला पत्र टाकले.

प्रिय सुनीती !

माझ्या मदतीस तू धावून आलीस हे मला अण्णानी कळवलं. खरचं! सुनीती तू किती मोठया मनाची आहेस. तुझ्या सहवासाचा मला लाभ झाला हे माझं केवढ भाग्य! ही गोष्ट मला कळली तेव्हा लगेच मला तुझं वाक्य आठवलं, "माझ्या मैत्रीणीसाठी मी वाटेल तो त्याग करायला तयार असेन! सुनीती तू खरच त्यागी आहेस मला पुष्कळ मैत्रिणी आहेत. पण तुझ्यासारखी तूच! तुझ्यामध्ये खऱ्या मैत्रीचा साक्षाकार मला घडला. तू माझ्यासाठी एवढं केलंस. पण मी तुला काही देऊ शकले नाही याचा मनाला खंत वाटते. मी तुला कधी ही विसरु शकणार नाही ,,

तुझी
सुमती

हे पत्र वाचून सुनीतीला कृतकृत्य झाल्याचे एक आगळे समाधान लाभले.


## मॉडर्न स्टील फर्निचर मार्ट

गोविंद रोड, नांदेड.

**अधिकृत विक्रेते :**

मिलर्स पॅन ॲन्ड कॉंक्रीट मिक्श्चर्स केल्वीनेटर, रेफ्रीजीरेटर्स, ब्ल्यू स्टार वॉटर कुलर्स, हर्क्यूलिस रोलिंग शटर्स, गुलमर्ग ओअर कुलर्स ॲन्ड रॅलिफॅन्स.

# तिसऱ्या महायुद्धातील संभाव्य अस्त्रे

– रमेश वसंत व्यवहारे
पी. यू. सी. ( कला )

परवा - परवा पर्यंत सर्वसाधारणपणे युद्ध जमिनीवर वा समुद्रावर लढले जात असे. परंतु या शतकाच्या सुरवातीपासून विमानकलेच्या प्रगतीबरोबर युद्धाचा रोख आकाश ते पृथ्वी अगर या उलट दिशेने बदलला आहे. विज्ञानच्या प्रगतीची घोडदौड इतक्या प्रचंड वेगाने सुरु आहे की, काळचे अस्त्र आज निष्प्रभ ठरु लागले आहे

आणि आता तर अंतरिक्ष हेच सैनिकी कारवाईचे केंद्र बनले आहे. गेल्याच वर्षी शुक्रग्रहापर्यंन्त पोहचणारे 'व्हीनस-४' आणि तदनंतर चंद्रतलावर उतरणारे 'झोंड -६ ' यांचा त्या देशाच्या अंतरिक्षस्पर्धेत वरचष्मा करण्यांस फार उपयोग झाला. रशिया व अमेरिका यांत चंद्रावर, पर्यायाने अंतरिक्षात कोण प्रथम अधिकार प्राप्त करतो याची भयानक स्पर्धा चालू आहे

शास्त्रज्ञ म्हणतात की, आगामी महायुद्ध मानवसंस्कृतीबाबत निर्णायक ठरणार असून पृथ्वीवर मानव आजच्या स्वरुपात राहील किंवा काय याबाबतीत ते साशंक आहेत. भौतिक प्रगतीच्या गोंडस नावाखाली भयानक विध्वंसक अस्त्रे निर्माण करुन ते आपआपल्या गटातील देशात वाटण्यात हे दोन प्रमुख देश मग्न आहेत.

अणुबॉम्ब, उदजनबॉम्ब, कोबाल्ट बॉम्ब आंतरराज्रीय प्रक्षेपणारी दूरगामी अग्निबाण, बॉम्बवर्षक विमाने, अंतरिक्षातून हेरगिरी करणारे उपग्रह, अंतरिक्ष बॉम्ब या ऐकाहून एक वरचढ विध्वंसक महाअस्मानंतर आता वैज्ञानिक जलवायुनियंत्रण पद्धतीची योजना विकसित होत आहे.

प्रत्येक देश आपली सैनिकीरचना गुप्त ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करतो. त्यामुळे निकटच्या काळात युद्धाची ठिणगी पडल्यास ते जिंकण्यास अमेरिका व रशिया कशी पावले टाकतील याचा अंदाज बांधता येत नाही. अधून मधून एखाद्या सैनिक अधिकाऱ्याकडून अगर सैन्याच्या त्या त्या भागातून निवृत होणाऱ्या लष्करी नेत्याने पत्रकारांजवळ सहजगत्या काढलेल्या उद्‌गारावरुन तज्ञांना आपआपला निष्कर्ष काढावा लागतो. अशावेळी वैज्ञानिक युद्धशास्त्रात आपण किती मागासलेले आहोत याची इतर राष्ट्रांना कल्पना येते. त्यामुळे साहजिकच गलित गात्र होऊन बड्या राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय निर्णयांना 'मम' म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही.

'एफ स्टेशनस' या साप्ताहिकास एका निवृत्त अमेरिकन जनरलने, तिसरे महायुद्ध झाल्यास ते अमेरिका जिंकू शकेल काय? या प्रश्नाला उत्तर देतांना म्हटले आहे की, चंद्र, मंगळ, शुक्र या ग्रहांवर जर अमेरिका प्रक्षेपणारचे तळ स्थापन करु शकली तर त्या तळावरुन उदजन बॉम्बशिर्ष असलेली नियंत्रित प्रक्षेपणारे पृथ्वीवरील कोठलेही लक्ष्य बिनचूक टिपू शकेल त्यामुळे अमेरिकाचा विजय निश्चित आहे.

याउलट रशियन सैनेचे प्रमुख पत्र 'क्वास्ना या ज्वेज' यांत रशियन हेरखात्यांच्या एका शास्त्रज्ञाचा खळबळजनक लेख प्रसिद्ध झाला आहे. तो म्हणतो कीं, अमेरिकेने आजमितीपर्यंन्त जे अनेक उपग्रह सोडले आहेत, त्यांतील बरेचसे हेरगिरीच्या कामगिरीवरच सोडलेले होते. अंतरिक्षातील भिन्न भिन्न माहिती मिळवून तिचा उपयोग पृथ्वीवरील शत्रू राष्ट्रातील आवश्यक माहिती कशी गोळा करता येईल, हे तंत्र आत्मसात करण्याचा त्या उपग्रहाचा मुख्य उद्देश होता, तर कांही उपग्रहांचा उद्देश रशियांतील परमाणु बॉम्बची निर्मिती-स्थळे व प्रक्षेपणा विरोधी सुरक्षा प्रणालींचा शोध घेण्याकडे करण्यात आला.

सोव्हिअेट रशियाने अंतरिक्ष–बॉम्ब तयार केल्याचे नुकतेच दृष्टोत्पत्तीस आले आहे. अमेरिकेचे अेके काळचे संरक्षणमंत्री रॉबर्ड मॅक्डनमारा यांनी ५ नोव्हेंबर १९६७ रोजी पत्र–प्रतिनिधीजवळ बोलतांना सांगितले की, रशिया कथागत बॉम्ब प्रणालीच्या विकास पद्धतीवर प्रयोग करीत असून आगामी दोन वर्षात तो त्यात यशस्वी सुद्धा होईल. रशियाने या प्रणालीच्या विकासावर गेली कित्येक वर्षे लक्ष्य केंद्रित केले आहे. रशियाने नुकताच असा अेक बॉम्ब तयार केला आहे की जो पृथ्वीपासून १०० मैल ऊंचीवर जाऊन पृथ्वीकक्षेतून पृथ्वीभोवती फिरेल. व थोडासा मार्ग आक्रमन 'रिट्रो-रॉकेट' च्या साहाय्याने नियोजित लक्ष्याचा भेद करील. हा अद्भुत अंतररिक्ष–बॉम्ब अधनकक्षेतून पृथ्वीतलांवरील कोणत्याही भागात १० ते ३० लक्ष टो. अेन् टी. शक्तीएवढ्या उदजन बॉम्बचा स्फोट करील. अमेरिकेने त्याचे नामकरण फॅक्शनल ऑर्बिटल बम्बार्डमेंट सिस्टिम (अेफ. ओ बी अेस.) किंवा फोब्स असे केले आहे. या भयानक बॉम्बपासून बचाव करण्यांकरिता अमेरिकेने सुद्धा 'ओव्हर द होरायझान' या रडार–प्रणालीचा विकास केला असून त्यामुळें अंतरिक्षातून होणाऱ्या आक्रमणाची सूचना तात्काळ मिळू शकते. अमेरिकेच्या संरक्षण-व्यवस्थेत प्रामुख्याने बेगूस रॉकेट व स्पिट रॉकेटचा समावेश होतो. अंतरिक्ष अग्निबाणाचा अंत करण्याची त्याच्यात क्षमता आहे. हे संरक्षक अग्निबाण चारही दिशातून वेगाने फिरणाऱ्या रडार व गतिमान गणकाने नियंत्रित व निर्देशित केलेले असतात.

सर्व साधारणपणे पूर्वी रशियाचे नौदल इंग्लंड-अमेरिकेच्या खालोखाल समजले जात असे. परंतु सागरी प्रभुत्वाचे राजकारणातील महत्व ओळखून त्यावेळचे रशियन कर्णधार क्रुश्चेव्ह यांनी नौदल व त्याच्या अण्वस्त्रीकरणावर विशेष भर देऊन आज अमेरिकेच्या बरोबरीचे स्थान मिळविली आहे. पाश्चिमात्य शास्त्रज्ञांच्या मते रशियाने गेल्या कांही वर्षात प्रक्षेपणास्त्र मुक्त युद्ध नौका आणि अणुशक्ती संचलित पाणबुडी विरोधी दल विकासित केले आहे.

प्रक्षेपणारोधाच्या अचूक क्षमतेबद्दल गर्वोक्तीने बोलत असताना क्रुश्चेव्ह अेकदा म्हणाले की, 'रशियन प्रक्षेपणारी विरोधी व्यवस्था अवकाशातील माशी सुद्धा अचूक टिपू शकेल. त्यामुळेच की काय, संरक्षण अंदाज पत्रकावर बोलताना अमेरिकेचे मॅकनमारा म्हणाले की, 'अमेरिकेच्या संभाव्य हल्ल्यापासून संरक्षण करण्यांकरिता रशियाने मास्को, लेनिनग्राड आदि प्रमुख शहरांभोवती प्रक्षेपणारथ विरोधी यंत्रे बसून ठेवली आहेत. बोल्शेव्हिक क्रांतीच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त लाल चौकातून लष्करी साहित्याची जी मिरवणूक निघाली होती त्यांत सामील असलेल्या १२२ फूट लांबीच्या आंतर महाद्विपीय अग्निबाणाने तेथे उपस्थित असलेल्या पाश्चात्य राजदूतांचे लक्षवेधून घेतले हाच तो अचूक मारा करणारा अग्निबाण होय.

अंतरिक्षातील मारक व रोधक या दोन्ही व्यवस्थांच्या शोधामुळे दोन्ही देशांत एक प्रकारचा समतोलपणा आला आहे म्हणून शास्त्रज्ञानी नुकताच शोध लावलेल्या लेसर किरणांचा विनाशक माऱ्यांकरिता उपयोग होऊ शकेल की काय, या दिशेने प्रयत्न सुरु केला आहे. 'लेसर, नामक यंत्रातून अत्यत बारिक पण प्रखर प्रकाशझोत बाहेर पडतात. अंतरिक्षात काही लेसर–किरण फेकताच ते हा हा म्हणता चंद्रावर पोहोचून सुमारे २ चौरस प्रकाशित करतात हे पाहून, त्याचे मृत्युकिरणांत परिवर्तन करण्याकडे शास्त्रज्ञ कार्यरत झाले आहेत, लेसर किरणाद्वारे उपग्रह, विध्वंसक यान अथवा प्रक्षेपणाला निष्क्रिय करण्याकरिता प्रयत्न सुरु झाले आहेत. हे शक्य झाल्यास लवकरच उपग्रह व उदजन बॉम्ब यांना अयनित करुन निष्प्रभ करतां येईल.

विविध ग्रहांचे आंतर मोजण्याकरिता सुद्धा लेसर किरणांचा उपयोग करीत आहेत. अशाच अेका यंत्राद्वारे दूरमापक बसविण्यात आले असून दिवशा ३००० मिटर व

रात्री १०,००० मिटर अंतरावरील लक्ष्य थोडयाच अवधीत शोधून काढून अण्वस्त्राचा अचूक मारा करण्याकडे याची मदत होत आहे.

याप्रमाणे एकापेक्षा एक महाभयंकर, महाभयानक, महाविध्वंसक अशा कल्पनातीत अस्त्रांनी सज्ज असलेली राष्ट्रे क्षुल्लकशा स्वार्थाकरीता महायुद्ध ओढवून घेवून मानवाच्या सामूहिक हत्येचे तांडव करण्यास कारणीभूत होतील. त्यात रणगाडे, तोफा, बंदुका, विमाने या परंपरागत अस्त्रांना स्थान राहणार नसून, लढाईची रंगभूमि एखादे मैदान अगर सागरी पृष्ठभाग नव्हे तर वैज्ञानिकांची प्रयोगशाळा राहणार आहे. कळ दाबताच अण्वस्त्रे असणारी प्रक्षेपणारी केवळ काही मिनिटातच लक्ष्य भेद करतील व मग चोहीकडे फक्त संहार! आणि उरेल फक्त राखरांगोळी ! !

त्यामुळे अणुविज्ञान प्रगत असलेल्या राष्ट्रातील विख्यात शास्त्रज्ञांनी अण्वस्त्र स्फोटांतून निर्माण होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विशेष अभ्यास करुन आपला अहवाल संयुक्त राष्ट्र संघाकडे पाठविला आहे यांत असे स्पष्ट नमूद केले आहे कीं, आजमितीपर्यंत झालेल्या निरनिराळ्या अण परमाणू व इतर भयानक बॉम्बच्या चाचणी स्फोटांमुळे वातावरणांत जितका किरणोत्सर्गी 'स्ट्राँगियम' युक्त झाला आहे की, आगामी अतपात कित्येक लक्ष व्यक्ती ल्युकेशिया, कॅन्सर आदी असाध्य रोगाने मरतील. कित्येक हजार हाडात होणाऱ्या फोडामुळें सडतील आणि सर्वात भयंकर म्हणजे अतपांतील होणाऱ्या पिढयांत पंगु व विचित्र बनावटीची कित्येक मुले निपजतील व ती राष्ट्राला आणि मानवी संस्कृतीला शाप ठरतील. परमाणू बॉम्बच्या स्फोटामुळे निर्माण होणाऱ्या निरनिराळ्या वायूमुळें मनुष्याच्या प्रजजननक्रियेत शिथिलता येवून मनुष्य नपुंसक बनेल.

हे सर्व जगू काही कमीच आहे असा थाटात आता शास्त्रज्ञ हवामानावर प्रभुत्व मिळविण्याचा प्रयत्न करीत आहेत. कारण तृतीय महायूद्धाचे साफल्य त्या देशांत वाहणाऱ्या नियमित ऋतुचक्रावर अवलंबून राहील अण्वस्त्र स्फोट करुन वाऱ्यांचा रोख शत्रूकडे वळविण्यास किरणोसर्गी राख व धूळ त्या देशांवर पडून अपरिमित नुकसान होईल.

विश्वसंहाराच्या योजनेची मजल भयानक संहारास्त्र निर्मित्या अितपत सीमित नसून निसर्ग बदलविण्याचा प्रयोग सुरु झाला आहे. रशियाने अिच्छित स्थळी पाऊस पाडण्याची क्रिया नुकतीच साधली आहे कदाचित् लवकरच पाहिजे त्या देशात पाहिजे त्यावेळी भयानक वादळ, घनदार धुळे, मुसळधार पाऊस व अतिशीत लहरी निर्माण करुन लोकजीवन अस्तावस्त करता येईल.

श्रीमती जीन डिक्सन या अमेरिकन भविष्य वर्तविणाऱ्या स्त्रीने असे सांगितले आहे की, तृतीय विश्व महायुद्ध हे इ. स. १९८० मध्ये सुरु होणार असून ते चीन विरुद्ध अमेरिका रशिया म्हणजेच सर्वजग असे लढले जाणार असूब त्यात चीनचा पाडाव होईल. सध्या रशिया व अमेरिका यांची मने जरी परस्पर विरोधी असली तरी त्यावेळी ते दोघे अेकत्र येतील. चीनच्या खडया सैनांची संख्या १० कोटी असून अमेरिकेची २६ लाख, रशियाची ३० लाख व भारताची फक्त ८ लाख आहे हे युद्ध १९८० ते १९८९ असे चालवार असून १९९० मध्ये अगावर अेका 'अवताराच्या' नेतृत्वाखाली शांतता निर्माण होईल असे ही तिने भाकीत केले आहे. हे युद्ध अरब-अिस्रायल, व्हिअेतनाम, भारत चीन यापैकी एका लढाईचेच मोठे रुप होणार आहे तिने यापूर्वी सांगितलेली ३ भविष्ये तंतोतंत खरी ठरली आहेत. १) भारत-पाकिस्तान फाळणी, २) महात्मा गांधी हत्या ३) अमेरिकेचे अध्यक्ष जॉन कॅनेडी यांच्या खूनीचे नांव ओस्वाल असे पूर्वीच सांगितले होते. १९९० मध्ये विश्वावर शांतता निर्माण करणारा देवदूत हा इ. स. १९६२ मध्येंच जन्मला असून तो कोणत्या देशांत जन्मला आहे हे सांगण्यास मात्र तिने नकार दिला आहे. □ □

---

## सुविचार

प्राप्त परिस्थितीशी शहाणा माणूस मिळते घेतो, आततायी भांडतो मूर्ख माणूस नाखुष असतो पण प्रतिभावंत तिचे स्वरुपच बदलून टाकतो

संधि, समज, संस्कार, सातत्य व साधना हीच यशस्वी जीवनाचे पंचशील आहे.

# पुनर्भेट............

– व्ही. आय. आलडवाड
बी. ए. ( प्र. व. )

पूर्वेकडे सूर्य अंगावरील काळी शाल बाजूस सारून पर्वताच्या कुशीतूनवर येत होता. गार वारा अंगाला झोंबत होता सूर्याचा गुलाबी प्रकाश अन्नपूर्णा आणि शालीनीच्या चेहऱ्यावर पडला होता. शीलाचे मन अतिशय प्रफुल्ल झाले होते. जणू कांही त्या आकाशांतील गुलाबी सूर्याचे स्वागत करण्यासाठीच की काय आपल्या सायकली वेगात चालवीत होत्या. सरोवरात एक एक कमळ उमलत होते व त्यांतून रात्र भर कमळाच्या पाकळीत बिसावलेले भ्रमर उडत होते ते या दोघीचे स्वागत करण्यासाठीच ... ...

मळ्यांत विहिरीच्या शेजारीं लावलेल्या गुलाबाच्या बहरलेल्या झाडा जवळ सायंकाळी थांबल्या. कारंजाच्या विहिरीत कारंजे उडत होती. त्या कारंजातून सूर्याकडे पाहिले असता मन आनंदाने भरुन जाई. कारंजाच्या प्रत्येक थेंबात सूर्याचे प्रतिबिंब क्षणैक टिके आणि नंतर लयास जात असलेले दिसे.

अन्नपूर्णा या देखण्याकडे एकाग्र होऊन पहात होती. पण सोनाचं याकडे लक्ष नव्हतं. कारंजाच्या विहिरी शेजारी बसून ती कोठे तरी शून्यात पहात होती. ती कांहीशी बेचैन दिसत होती. वारंवार तिची नजर रेल्वे-स्टेशनकडे नकळत जात होती रेल्वे येण्यास अद्याप अर्धा तास अवकाश होता पण गाडीला येण्यास उशीर झाल्या सारखें तिला वाटत होते. मनोरथ करण्यांत ती गुंग झाली होतं. आशा आकांक्षांचे ती वृक्षारोपण करत होती. आणि लगेच त्या वृक्षारोपणाचा भरगच्च पर्णबहार आणि पुष्पबहार पहाण्याची सुन्दर स्वप्ने रंगवीत होती. मनातील कल्पवृक्षांच्या दाट छायेखाली ती स्वतःला विसरुन जाऊन मनातील आकांक्षा साकार करु इच्छित होती. त्या कारंजाप्रमाणे तिच्या मनातील कल्पनेची कारंजी उंच उंच उडत होती. तिची दृष्टी त्या पाण्यांत होती. त्या पाण्यांत ती आपल्या जीवनाच्या कादंबरीची कांही पृष्ठे उलटीत बसली होती.

मॅट्रीकची परीक्षा देऊन आल्यानंतरचा तो दिवस तिला आठवला. विलास तिच्याकडे आला होता. त्याला पहाताच तिच्या नेत्रातून आनंद ओघळू लागला. आपले अश्रू त्याला दिसू नयेत म्हणून तिने लाजल्यासारखे केले. विलासने प्रेमाने तिला जवळ घेतले. हळूच तिचे डोळे पुसले. तिचे मन आनंदाच्या सरोवरांत कमलरुपी विलासशी खेळत होते. तिने विलासला मिठी मारली..

सुट्टीचे दिवस संपले होते. परिक्षेच्या निकाल पण लागला होता दोघेही पास झाली होती. कॉलेज थोड्याच दिवसांत सुरु होणार होते. कॉलेजच्या मोकळ्या वातावरणांत सीलाशी मनमोकळे भेटाय बोलायला मिळणार होते. ही कित्येक दिवसाची इच्छा आता साकार होणार होती. याच विचारांत रात्री कॉलेजच्या जीवनाची सुख स्वप्ने रंगवित हा गेला कॉलेजकुमार कॉटवर पडला होता. त्याच्या मनातील आकाशांत कल्पनेचे राजहंस स्वैर भरारी मारत होते. आजकालचा तरुण वर्ग कल्पनेच्या पर्णबहारांतच आपले जग निर्माण करतो आहे. मग त्याला हा भावी कॉलेजकुमार का अपवाद होता ?

अिकडे देशाच्या स्वातंत्र्यास धोका निर्माण झाला होता. मातृभूमीच्या हाकेला ओ द्यावयास तरुण वर्ग सिद्ध झाला होता प्रेमापेक्षा त्याला मातृभूमिची सेवा करण्यांत वेळ पडल्यास प्राण त्याग करण्यांतच जीवनाचे साफल्य वाटू लागले. विलासने एकदम उठून आपली पेटी उघडली एका कागदांत व्यवस्थित ठेवलेला फोटो बाहेर काढला. त्या सोबत एक पत्र होते.

चि. विलास !

शुभाशीर्वाद

तू एका देशभक्ताचा मुलगा आहेस. आपल्या भावी जीवनांत तुझ्या सुख-विलासांत सुद्धा देशावर आलेल्या संकटाला विसरु नकोस. हीच शेवटची अिच्छा व्यक्त करतो आहे.

कळावे, तुझा पिता

या दोनचार ओळींनीच त्याला भरावून टाकले. त्याच्या मनांत कर्तव्याची भावना जागा झाली अश्रुपूर्ण नेत्रानी त्याने पित्याच्या फोटोकडे पाहिले. त्याचे वडील हसल्याचा त्याला क्षणेक भास झाला. फोटो आणि पत्र व्यवस्थित ठेवून त्याने पेटी बंद केली. आणि अस्वस्थपणे कॉटवर पडला. "मी युद्धभूमीवर गेल्यावर माझ्या आईचे कसे होईल ? तिचे पालन पोषण कोण करील ? तिच्या वृद्धावस्थेत तिला कोण मदत करील ? " या प्रश्नानी त्याला त्रस्त केले. त्याला रात्रभर झोप कांही लागलीच नाही. सारखा विचार, विचार आणि विचार ! सकाळी सहा वाजले तरी तो उठला नाही, त्याला जाग आली तेव्हा सकाळचे नऊ वाजून गेले होते. तो उठला. पेपरवाल्याने पेपर आणून टाकला होता. त्याने तो हातात घेतला. "मातृभूमीच्या सेवेसाठी एअर-फोर्स मध्ये भरती व्हा." असे आवाहन केलेले पहिल्याच पानावर त्याला दिसले. त्याने निश्चिय केला की आपण सैन्यात काही झाले तरी जायचेच. स्नान संध्या उरकून त्याने आई जवळ हलकेच गोष्ट काढली- पण आईने स्पष्ट नकार दिला.

'परकीय शत्रूच्या आक्रमणाला तोंड देण्यासाठी मला युद्धावर गेलेच पाहिजे आई '

" विलास! तुझ्यासाठीच तर मी जगे आहेना रे. तुझ्याशिवाय माझं या जगांत आहे तरी काय ? तुझे वडील तिकडेच मृत्यू पावले. मरतेवेळी मला त्याचं दर्शन पण झालं नाही इतके मी अभागी आहे. त्यांच्या मृत्यू-नंतर मी तुझ्याकडे तर पाहून जगते. विलास एका सुंदर सुगंधित फुलाला कोणता माळी विस्तवाच्या खाईत फेकील कोणती आई आपल्या पोटच्या गोळ्याला मृत्युच्या दरीत ढकलेली? विलास माझ्या हयातीत तरी तूं सैन्यात जाऊ नकोस "

आईचा प्रत्येक शब्द विलासच्या निश्चयावर आघात करीत होता. त्याला अतिशय दुःख होत होते. तो म्हणाला. "आई हे तुझे सुगंधी सुंदर फुल एके दिवशी कोमेजणार आहे एके दिवशी या फुलाचा अंत हा निश्चितच आहे. मग कर्तव्य करत असताना मृत्यूने कवटाळले. तर काय वाईट आहे. ? आई! मातृभूमीच्या रक्षणासाठी युद्धावर पाठविणे हे तुझे ही कर्तव्य आहे. मला रणांगणावर पाठविले, सर्वश्रेष्ठ कर्तव्याची जाणीव करुन देणे हे तुझे कर्तव्यच ठरेल आई. आई आठवतं का बाबाची ती शेवटची ईच्छा, ते शेवटचे पत्र ? केवळ बाबांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी मी जात आहे असं समज. त्यांची ती ईच्छा पूर्ण करण्याची मला संधी दे ना आई –? "

आपल्या पतीची शेवटची ईच्छा आठवताच आईचे नेत्र अश्रूनी डबडबले तिने विलासला हृदयाशी घट्ट कवटाळले. आणि अश्रूपूर्ण नेत्रांनी, जडअंतःकरणाने ती उद्गारली ' जा बाळ आपल्या वडिलांची शेवटची ईच्छा पूर्ण कर. "

आईच्या जड अंतकरणांतून निघालेल्या ह्या उद्गाराने, कर्तव्याने भरलेल्या वाणीने विलासचे हृदय भरुन आले. त्याच्या दाटलेल्या हृदयामुळे त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. आईविषयीच्या कृतज्ञतेने त्याच्या डोळयात पाणी आले. .

रात्र झाली होती. सर्व जग निद्रा देवीच्या कुशीत शांत झोपी गेले होते. सर्व जगावर काळोखाचे साम्राज्य पसरले होते शीला आपल्या पलंगावर पुस्तक वाचत पडली होती. अितक्यांत कोणाच्या तरी पावलाचा आवाज तिला ऐकू आला. अशा वेळी कोण येत आहे हे पाहण्यासाठी भीत भीत तिने खिडकीतून बाहेर पाहयली. एवढ्यांत

शीला, ही हाक तिच्या कानावर आली. विलासचा आवाज तिने ओळखला व दार उघडले. पायांतील बूट काढतच विलासने दार बंद केले आणि तो कॉटवर पडला.

यावेळी येण्याचे कष्ट आपण का बरे घेतले ? कॉटवर बसत तिने विचारले.

काय करु शीला ? मन बेचैन झालं. सारखी तुझी मूर्ती नजरे समोर येऊ लागली, स्मित करीत विलास म्हणाला. तुम्ही असें अितके वेडे का होता ? आता थोडेच दिवस आहेत. त्यानंतर मी आपलीच आहे. मग अशी चोरुन भेट घ्यावी लागणार नाही.

शीला तुला माहीत नाही की चोरटं प्रेम हे किती मधुर असतय ! चोरट्या प्रेमाशिवाय जीवनांत रहस्यच नाही.' विलास, आज कितो दिवसानी आपण एकांतात भेटत आहोत, " आज भेटलो आहो. पण यापुढे भेटणं अशक्यच वाटतं. "

असं का म्हणता बरं! यानंतर तर आपण एकच होणार आहोत . .

नाही शीला, आता यापुढे आपली भेट होण्याची शक्यता फारच कमी वाटते. परमेश्वराची कृपा असली तरच आपण एक होऊ. तो कोठे तरी आकाशांत पहात खिडकीचे एक दार बंद करीत म्हणाला.

विलास असं का बोलतोय शीलाला समजेना. प्रश्नार्थक नजरेनं ती त्याच्याकडं पहात राहीली.

ते पहा शीला, त्या उत्तरेकडे पहा. क्षणांत तुटली, नि लख्ख प्रकाश देवून नाहीशी झाली. त्याप्रमाणें मी तुझ्या जीवनांत कदाचित . . .

विलासने आपल्या बरोबर आणलेली एक वस्तू शीलाला देत म्हटले. ही घे माझी शेवटची भेट. ती फोटोफ्रेम होती . . विलासने तिला आपला निर्णय सांगितला. तिनें ते ऐकून घेतलं. तिचे डोळे पाणावले होते. ती म्हणाली याबद्दल मी तुम्हाला काय देवू ?

तुझं असंच प्रेम असू दे, म्हणजे पुरे.

तिनें पेटी उघडली व आंतून सारंग काढून देत ती म्हणाली, ही घ्या माझी छोटीशी भेंट आणि माझी आठवण गुणगुणत रहा.

. शिलाच्या चेहऱ्यावरील गुलाबी रंग फिका पडला. तिच्या नेत्रासमोर काजवे चमकत असल्याचा तिला भास झाला.

शीला मला कल्पना आहे की या माझ्या जाण्यानं तुला दुःख होत आहे ते. तुझं प्रेम माझ्या पाठीशी आहे. या तुझ्या विशाल पवित्र प्रेमाच्या बळावरच मी माझं कर्तव्य पार पाडू शकेन . . शीलाने सरबत केले आणि विलासला देत ती म्हणाली, हे घ्या.

विलासने ग्लास हातांत घेतला. शीला हृदयांतील दुःखाला नेत्राद्वारे वाट करुन देत होती. 'विलास थोडे थोडे सरबत पीत होता. तिने वर पाहिले. विलास अद्याप सरबत पितच होता.

किती वेळ पिणार आहांत हे सरबत ?

मला वाटतय जीवनाच्या क्षणापर्यंत असंच पीत रहावं. विलास मी किती स्वप्ने पाहिली होती. आतापर्यंत मी मनाच्या रंगमंचावर कल्पनेची मधुर गीते गात नाचत होते पण आज . . . तिच्या तोंडातून शद्ब निघत नव्हते.

होय शीला मनुष्याच्या सर्वच आशा सफल होत नाहीत. अतिशय आनंद अथवा दुःख यानी मनुष्य वेडा बनतो. शीला ! जीवन हे एक फुल आहे. ते केंव्हा कोमेजले, त्याचा अंतकाल केंव्हा येईल याचा नेम नाही. पण त्या-साठी मनुष्याने कल्पनेचे मनोरे का बांधावे ?

विलास मनुष्य हा आशेवरच जगतो. दिशाहीन मनुष्याच्या मनांत आशा नसतात. मनुष्य आशेच्या पलिकडील लपलेले तृप्तीचे जग हुडकण्याचा प्रयत्न करीत असतो.

शीला,. एवढी कष्टी बनू नकोस. मला विश्वास आहे की हा विलास शेवटपर्यंत तुझाच राहील. आज ना उद्या आपलं मिलन झाल्या वाचून राहणार नाही.

बरं शीला झोप आता. रात्र बरीच झालेली आहे. मी उद्या जाणार आहे. हीच शेवटची भेट.

शीलाने त्याच्या कपाळी गुलाल लावला आणि त्याला तिने घट्ट मिठी मारली. तिला दुर सारुन विलास जायला निघाला. खिडकितून शीला पहात होती. तिला कांहीच दिसत नव्हते. तिचा प्रियकर काळोखांत दिसेंनासा

झाला होता. तिच्या जीवनात काळोखानें प्रवेश केला होता. काल परवा विलासचे पत्र आले होते. तो आज येणार होता. म्हणूनच शीला वारंवार रेल्वे स्टेशनकडे पाहत होती. तिला मागचे दिवस आठवू लागले. . . विलासच्या एकांतातल्या भेटी. ... त्याचे आपल्यावरचे प्रेम ती स्वप्ने त्या आकांक्षा ... ...

अितक्यांत पोस्टमनने तार आणून दिली. तिने तार वाचली आणि तिच्या भोवती जग गरगरा फिरु लागले. काय होतय हे कळण्याच्या आतच धाडकन जमिनीवर कोसळली. अन्नपूर्णीने हे पाहिले धावतच ती शीलाचा जवळ आली, जवळ पडलेली तार ती वाचू लागली. तिला पण भोवळ आल्यासारखे वाटले. थोड्या वेळांत शीला शुद्धीवर आली.

आज तिचे स्वप्न मातीमोल झाले होते विलास युद्धाच्या शेवटच्या दिवशी मरण पावल्याचीच ती तार होती. आज तिचा रंगमंच मोडला होता. ती डॉक्टर झाली होती पण तिचा विलास नव्हता. . . सगळया आशा धुळीला मिळाल्या होत्या. . .

पण असे किती दिवस ? ती किती दिवस विलासच्या आठवणीचे गीत गाणार ? तिचा विलासका आता परत येणार होता ? मग त्याच्या आठवणीला अश्रूची फुले किती दिवस वाहत बसावे ? घरातल्यांच्या इच्छेखातर तिला लग्न करावे लागले. डॉ. किशोर बरोबर आता तिचे जीवन आनंदात जात होते. तिच्या जीवनाच्या बागेला आता नवीन माळी मिळाला होता. . .

आज विलासचा जन्मदिवस होता. शीला व डॉ. किशोर मळयात फिरावयास गेली होती तीच बाग, तीच कारंजाची विहीर, तेच दृश्य तीच फुल-झाडे. सायंकाळच्या सूर्य प्रकाशामुळे आकाशाचे बदलणारे रंग पाहत डॉक्टर उभे होते. अनपेक्षितपणे कोणाची तरी कार मळयापर्यन्त आली. जरा वेळ थबकली. आणि आली तशी धूळ उडवीत निघून गेली. ती विलासची कार होती. शीलाने तिकडे पाहिले. तेव्हां तिला धक्काच बसला. आपण स्वप्न तर पाहत नाहीना असे तिला वाटले. . .

मधाशी घडलेल्या त्या अद्भूत प्रकाराने शीलाला रात्रभर झोप आली नाही. सकाळी पेशंटना भेटण्यासाठी म्हणून ती दवाखाण्यांत गेली. नोकराने पत्र आणून दिले. पॉकिटावरचे हस्ताक्षर पाहून ती गोंधळूनच गेली. तिने पत्र वाचण्यास सुरुवात केली.

प्रिय शीला

शुभाशीर्वाद !

मला कल्पना आहे की, तू आज सुखाच्या आकाशांत स्वैर भरारी मारीत आहेस. अितके दिवस मी आशेच्या सुखमय छायेखाली गाढ झोपी गेलो होतो. तुझी स्वप्ने पाहत मी येणाऱ्या उद्याची वाट पाहत होतो. पण: . .

काल मळयांत मला तुझं दर्शन घडलं आणि माझ्या आशा आकांक्षाची क्षणार्धात राखरांगोळी झाली. मी मृत्यूच्या दरीत उडी घेतली नव्हती. पण मी फार जखमी झालो होतो. मरण दारावर असताना ओडावर तुझं नांव होतं. आणि म्हणूनच मी बरा होऊ शकलो.

शीला ! खरं आहे की आमच्या पुष्कळ आशा. अकांक्षा तेथपर्यंत मधूर असतात जो पर्यंत त्यांच वास्तविक स्वरुप दृष्टीस पडत नाही.

शीला ! माझ्या अंधकारमय जीवनांत एकच आशेचा किरण दिसत होता. तोही आता नष्ट झाला. शीला ! आता जगण्यांत कांहीच अर्थ नाही. मनुष्याच्या जीवनांतील गोड स्मृतीचा अंत केंव्हा असेल तर तो त्याच्या शेवटच्याक्षणी, तो जीवंतपणी मरत असतांना...

शीला हे पत्र वाचून मला भेटायला उतावीळ होऊ नकोस, की पत्राचे उत्तर देऊ नकोस. कारण पत्र पोहचण्याच्या अगोदरच सर्व कार्यभाग आटोपला आहे. प्रेमात प्राणत्याग कारण हे सैनिकाला शोभण्यासारखं कृत्य नव्हे, पण आता ह्या निराश, निरस, जीवनातून मुक्त होण्यासाठी हे कृत्य करावं लागतय.

---

**सुविचार**

आपल्या ताटात असलेले अन्न स्वतः खाणे म्हणजे प्रवृत्ति, स्वतः अर्धपोटी राहून भुकेल्या व्यक्तिस वाटा देणे म्हणजे संस्कृति आणि दुसऱ्याच्याही ताटातल्या अन्नावर तुटून पडणे म्हणजे विकृति होय.

नयन मनोहर अनेक रंगी
सुबक व सुंदर छपाईचे
देगलूर शहरातील
एकमेव ठिकाण

# परवीन प्रिंटिंग प्रेस

☆ अद्ययावत यंत्रे
☆ कुशल कामगार
- आणि -
☆ वक्तशीर काम

वहिखाते, बिल बुक, लेटर पॅड, बांईडिंग
व रबर स्टँप इत्यादी सर्व प्रकारची
कामे केली जातात

प्रो. सातकशा व अर्देशर दिनाशाजी जिल्ला, देगलूर

# पौर्णिमेचा चंद्र

- सुरेश कुळकर्णी (बी. ए. प्र. व.)

पौर्णिमेच्या चांदण्या त्या
दुग्धापरि शुभ्र होत्या
चंद्राभोवती फेर धरोनी
आनंदाने नाचत होत्या

चंद्र त्यांना खुणवीत होता
परि अर्थ त्यांना उमगत नव्हता
अजाणता पाहुनी त्यांची
क्रोधाने तो फुलला होता

क्रोध तो पाहुनी त्याचा
आश्चर्य मुग्ध त्या होत होत्या
क्रोध भुलविण्या चंद्राचा त्या
मधुर स्वराने गात होत्या

प्रयत्न तो पाहुनी त्यांचा
चंद्र मनी हासत होता
तारांबळ पाहुनी त्यांची
वाकुल्या त्यांना दावित होता.

# एक कविता

तेज निवळीकर (पी. यू. सी. कला)

आम्ही इथे जागोजागी सूर्यच
पेरले आहेत म्हणे पोथ्या पुराणातुन
(कोणी तरी म्हणतात आम्ही त्याचीच फळे चाखतोय)
आता तर आमच्या पाया खालची
जमीन चक्क काळीभोर दृष्टीस पडते
(ढेकूळही उरले नाही. आणि मातीही राहिली नाही)
बाजूच्या शेतांमध्ये मोड उठून
तर्र झालेत
(पण आभाळात ढग आलेले नाहीत)
हे पाहून वाटते आपण आहोत
तेच चांगले आहे.
(निदान विज्ञानाच्या युगातून रात्र पेरली नाही एवढे-
तरी पाप आमच्या हातून घडले नाही)

# ऊठ शेतकरी दादा!

काशीनाथ कोटीवाले, पी. यू. सी (कला)

ऊठ शेतकरी दादा
झाली पहाट सोन्याची
हाक ऐकू आली कानी
आरवल्या कोंबडयाची!

पाणी प्यावया उसाचा
तुझी वाट पाहे मळा
कौतुकाने विहिरीचा
आला भरुनिया गळा!

यंदा तुझ्या शेतामदी
झाल हिरव रान
अरे! शेतकरी दादा
तुझें उल्हासेल मन!

खते टाकून भरघोस
झाली कापूस नि ज्वारी
कर्ण – कुंडले पिवळी
त्याला तुरीच्याच हारी!

उठ शेतकरीदादा
झाली पहाट सोन्याची
तुजवर अवलंबून!
सर्व योजना देशाची!

# नववधू

गंगाधर टिपराळे, बी. ए. (प्र. व.)

नववधू प्रिया मी बावरते
नका पाहू गडे असे लाज मला वाटते
हृदय माझे सजणा अहो धडधडते
नववधू प्रिया मी बावरते

मनात माझ्या अनंदाचे झरे वाहती
अन् गुलमोहोराची लाख - लाख फुले फुलती
प्रीतीचा कोष तुम्हा भवती गुंफते
नववधू प्रिया मी बावरते

# दोन कविता

देविदास मंदाडे बी. ए. ( द्वि. व. )

सर्व दुःखे पोसतोय उरी
धागे जुळवत जुळवत
दान करतोय सर्व इच्छांचे
दानशूर म्हणवण्यासाठी
अर्थहीन झालेल्या कोरड्या डोळ्यात
साठवून ठेवतोय किंमत--
केलेल्या"दानाचा मोबदला,
"व्यवहारी जगाकडून मिळालेला
आकारहीन झाले आहे
काळोखात दडलेले
कर्म दारिद्र्याच्या झुंजीतून
बाहेर पडलेले नग्नप्राय अस्तित्व
फक्त उरले आहे
गगन भरल्या आठवणीचे सूर
घुमत आहेत सारखे
अनादि-अनंत अशा पोकळीतून
साऽ वऽध, रात्र वैऱ्याची आहे
साऽऽ वऽध, साऽऽ वऽध.

( २ )

डोळ्यानीच पहावे, डोळ्यानीच बोलावे
डोळ्यानी सांगावे, डोळ्यानीच ऐकावे
सर्व काली, सदान् कदा
मनाच्या दुःखाला डोळ्यांचेच पाणी
डोळ्यातच फुलतात आनंदाची गाणी
डोळ्यानीच आठवावे, डोळ्यानीच विसरावे
पांघरुन निळे डोळ्यानीच घालावे
अंताच्या समयी डोळे उघडेच असतात
मरणानंतरच्या मार्गावर रोखलेले !!

# दोन कविता

पंढरी पिराजी सुरनर बी. ए (द्वि. व.)

मनी माझ्या बहू आकांक्षा
येत होती जवळी परीक्षा
वाचीत होतो बसून खुर्चीवरी
ठुमकत ठुमकत आली परी
उत्तरली आळशाची सुन्दरी,
" मज ओळखले का पंढरी ?
मी तर तुझी सखी बावरी,
इच्छा तृप्तीस्तव ये शेजारी ! "
नाइलाज म्हणोनी गेलो तिच्या बरोबरी
सुख काय वर्णू ? ते अमृतापरी !
सांगू न शके हिचिया कृत्याची थोरवी
ही तर माझी सखी, प्रिया निद्रादेवी !!

(२)

दिवा जळे सारी रात
अंधार परि जीवनात
काहूर न उठे मनात
जहाज उठे वादळात

होरपळल्या साऱ्या मनीषा
अंधारल्या दाही दिशा
भेटणार कधी किनारा ?
जीवनाचा निर्जीव पसारा !

# ढेकर

**विजय वाकडे,** बी. ए (द्वि. व.)

आकाशातल्या बापानं सोडलं म्हणून
इथं कसा तरी मी जगतो आहे.
पोटात कावळें कावकावतात
तेव्हां वाटतें की, मी जिवंत आहे - !
अेक दिवस त्याला विचारतोच
वेड्या, तुझ्या जवळ नव्हतं तर
कां सोडले हे ओरडणारे जीव
या कर्मीनं घ्यावा कुणाचा आधार - - ?
पण जेव्हां फिरते कोरडी जीभ
माझ्या शुष्क झालेल्या ओठावरुन
कळून येते तेव्हां की आपल्याला नाही वाचा
तर काय फायदा विचारुन - - ?
अेक दिवस त्यालाही कीव येते
अंधाऱ्या रात्री वाजते माझी ताटी
'चल ये ! ' मोठ्या विश्वासाचे शब्द ते
नाही होणार प्रतारणा शेवटी–!
आणि त्याच्यावर पूर्ण विश्वासून
चालू लागलो त्याच्या सांगाती
पाहिले नाही अेकदाही मागें वळून
स्वार्थी जगाची नव्हती क्षिती – !
त्याने खुणावले तिकडे पाहिले
सरणावर घेअून ज्वाळेचा अुबारा
शांत चित्तान मी पहुडलो होतो
(रडणारे! ) रडत होते, मोजून दिवस तेरा!
तेराव्या दिवशी माझ्या अंगणात
पोळीवर सुटत होती तुपाची धार
अन् प्रत्येक जण अुठत होता
देअून तृप्तीचा प्रदीर्घ ढेकर - - ! !

# दोन कविता

श्यामतनय बी. ए. ( प्र. व. )

गंगा म्हणजे पाणी, पाणी म्हणजे गंगा
आणावयाची आहे शब्दात चंद्रभागा
घ्यायचे आहेत सूर पक्ष्याना हवेत
माश्याना पाण्यात, तसे मला कवितेत
ज्याचा मिळेल रंग, तोच रंग पाण्याचा
अक्षरात मिसळून 'अक्षर' कप्याचा
बसायचे आहे नदी काठी
प्रतिमेसाठी भूक शांती मिळण्यासाठी
उडवायचे आहे तुषार पाण्यातून
उधळायची आहेत स्वप्न गणयातून

**मनोरथ -**

विटेवरील मूर्ती हलेल केंव्हा
मिटलेले आहे उघडील केंव्हा
किलकिले करील का डोळे
कान देऊन ऐकेल का सगळे ?
कटीवरले हात तापलेल्या डोक्यावर
निवेल सारे शांत हवेवर
झोपेच्या रात्री स्वप्ने येतात
मनाला तशी फळे लागतात.

# दोन कविता

## जीवनाची नाव.

जीवनाची नाव
वल्हविता वल्हविता
आश्रूच्या सागरास
येती भरती जोरात
दु:खाचा वारा
वाहतो वेळी अवेळी
जीवनाची नाव होलकावते
इकडे तिकडे चोहीकडे

**वाघमारे**

## शिणला रवि

शिणला रवि
चालला अस्था
पश्चिम दिशा
दर्शविते दु:खा
दु:खाची लाली
भरुन कपाळीं
दाखविते जणू
आहेच सती
बाजा तयाशी
किलकिलाट पक्षी
अर्घ्य तयाशी
कोमजती कळी
रडतो निसर्ग
अस्था रवि
पण हे जग
आहे विचित्र
लाइटच बटन
दाबते खटकन

**ना. ल. वाघमारे.**

# आज पाखरूं एकटच होतं.

थरटे सोडून पाखरुं
उंच उंच गेल होत
निर्सग रम्य आकाशात
घिरट्या ते घेत होते
आज पाखरुं एकटच होतं.
पुढच्या घोळक्यात मिसळण्यासाठी
सतत ते धडपडत होत
वाट सरळ आसतां देखील
वळणाहून ते ऊडत होत
आज पाखरुं एकटच होतं.
साथ त्याला मिळत नव्हती
यामुळ ते हृदयातच
जळत होतं ............
जळत होतं ...... .....!
आज पाखरुं एकटच होतं.

**गोविंद नरसिंगराव जोशी (थडी बोरगांवकर.)**

# अेक आलाप

तुझ्या ओठातून शब्द निघत नाही
हृदयाची तार वाजत नाही
मी बोलतो तेंव्हा
हसतेस तू मात्र
हास्यातून अर्थ समजत नाही
तुझ्या गूढ गुपिताचे,
– खरे सत्य कळत नाही
तारेवर बोट पडल्या विना –
– स्वर नाद निघत नाही
तार वारंवार छेडल्या शिवाय
– पुर्ण आलाप बेणार नाही

**आनंद दिगांबरराव (बोरगांवकर)**

# मे. नरसिंग गोविंद रेखावार

वितरक : हिंदुस्थान लिव्हर लि. मुंबई
सोप्स् व फुडस् डिव्हिजन

*होलसेल अँड रिटेल किराणा मर्चंट*
*देगलूर.* (जि. नांदेड.)

—: विक्रेते :—

विमको मॅचेस, सिगारेटस्, टॉयलेट साप्स, हेअर ऑईल्स,
इलक्ट्रिक लॅम्प्स,

एक वेळ अनुभव हीच खात्री

—: हेड ऑफीस —

*गोविंद नारायण रेखावार*
*सराफी दुकान, देगलूर.*

देगलूर परिसरातील, सुबक, सुंदर, उत्कृष्ट, व योग्य दरात वेळेवर छापून देण्याचे अेकमेव ठिकाण

म
म नो ज
ज

# मुद्रणालय, देगलूर.

*अनुभव हीच खात्री*

प्रो. जी. एस्. गोपछडे बोरगांवकर.

पत्ता :— गांधी चौक, दे ग लू र.

# मानवतावाद

● के. एस. आचमारे
बी.ए. द्वितीय वर्ष

मानवतावाद ही आधुनिक तत्वज्ञानातील स्वतंत्र विधायक विचार पद्धती आहे. अशा पद्धतीचे स्वरुप केवळ भावात्मकच असते. भावात्मक बाजूचा विचार जसा आहे, तसा या पद्धतीची दुसरी बाजू म्हणजे अभावात्मक देखील आहे. परंतु भावात्मक–अभावात्मक या दोन्ही अंगाचा विचार करुनच नवीन मानवतावादी तत्वज्ञ मानवतावादी ज्ञान स्वनात्मक कार्य करीत असतात.

जगातील सर्व भौतिक शास्त्रे, कला, संस्कृती, धर्म, परंपरा, आचार–विचार, श्रद्धा, या सर्वांचा मुळात हेतू आखिल मानवजातीचे कल्याण, सुख साधणे हाच आहे. मानवी जीवनाचा विचार करणाऱ्या सर्व शास्त्रांचा अभ्यास जरी ज्ञानसाधना म्हणून होत असला तरी, पण देखील शास्त्राच्या भूमिकेमागे ज्ञानसाधने शिवाय अन्य हेतू असू शकतो. उदा. अखिल मानवजातीचे सुख वाढविणे इत्यादी. परंतु आधुनिक काळात मानव हाच सर्व गोष्टीचा निकष समजला जातो. यासाठी जगातील निरनिराळे तत्वज्ञान, विज्ञान यांच्या मदतीने निसर्गातील घटनांचे निरिक्षण करुन, परस्पर घटनातील कार्यकारण भेद स्पष्ट करण्याचा प्रयत्न जसजसा अधिक वाढत जातो तसतसे निसर्गावर मानवाचे नियंत्रण वाढत जावून निसर्गातील घटकांचा उपयोग दुरुपयोग या विषयांचे आपले ज्ञान वाढत आहे. निसर्ग–व्यक्ती व समाज यांचे परस्पर संबंध कशा प्रकारचे आहेत, याचा विचार करुन उत्तरे देण्याचा प्रयत्न शास्त्राज्ञ करीत आहेत. मानवतावाद हे तत्वज्ञान निसर्गाला धरुनच आहे. निसर्गात अनेक घटक विपुल प्रमाणात सापडतात. त्याविषयी अधिक ज्ञान झाल्यास त्याचा उपयोग मानवाचे सुख वाढविण्यासाठी केला पाहिजे. उदा. ऑक्सीजन, पाणी, लोखंड, पितळ, तांबे इत्यादी वस्तु निसर्गात विपुल प्रमाणात सापडतात. तसेच निसर्गात अनेक चमत्कार दिसतात. उदा. भूकंप होणे, लाकडावर लाकडे घासून अग्नि आपोआप तयार होणे, इत्यादी या घटनांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न संस्कृतीच्या प्रारंभीच्या अवस्थेत झाला किंवा नाही हे निर्णायकपणे सांगता येत नाही. अशा नैसर्गिक घटनांचा अर्थ न समजणे हे त्याकाळी स्वाभाविकच होते. आधुनिक काळात विज्ञानाची जी वाढ झाली

तेवढी वाढ त्या काळी झाली नव्हती. वरील नैसर्गिक घटनांचा अर्थ लावण्यात विज्ञानाने जे ज्ञान दिले तेच कारणीभूत ठरले आहे. परंतु संस्कृतीच्या प्रारंभी विज्ञानाची वाढ झाली असल्या कारणाने लोकांची समजूत वरील घटनेसंबंधी चमत्कारिक झाली. ईश्वराच्या प्रकोपामूळे किंवा जगात अधिक पाप वाढल्यामूळेच भूकंप होतात अशी जी एक समजूत लोकांची होती, ती आता राहिली नाही. भूकंपा–सारख्या घटनेच्या अर्थाविषयीचे अधिक ज्ञान विज्ञानामुळेच आपणास झाले. भूकंपाचे कारण मानवजातीचे पाप किंवा दुराचारण नसून ती एक नैसर्गिक घटना आहे. पावसाचे पाणी जमिनीत मुरल्यामुळे भूगर्भातील उष्णतेमुळे पाण्याची वाफ तयार होऊन जमिनीचा पृष्ठभाग ज्या ठिकाणी कमी टणक असेल त्या भागातच भूकंप होतो. विज्ञानामुळे निसर्गातील निरनिराळ्या घटकांचे गुणधर्म व त्याविषयीचे ज्ञान स्पष्ट करुन सांगत असल्यामुळे निसर्गातील घटकांचा उपयोग मानव करुन घेऊ लागला. माणूस हा एक निसर्गाचा भाग असून तो आपल्या बुद्धीच्या साह्याने निसर्गा–ची रचना समजून घेऊ शकतो. कारण तो नियम–बद्ध अशा निसर्गाचाच एक भाग आहे. निसर्गात घडणाऱ्या घटना, घटकातील परस्पर संबंधाविषयी ज्ञान मिळवून कार्यकारणभाव समजून घेवून तो स्वतः आनंदाने जगू शकतो, अशी त्याची श्रद्धा आहे. निसर्गाची रचना कार्यकारणाधिष्ठत आहे. त्यांचे नियमन ईश्वराच्या इच्छेने होत नसते. माणूस हा बुद्धिजीवी असल्यामुळे दैवी वाटणाऱ्या नैसर्गिक घटनांच्या अनुभवाने अर्थ लावू लागला. बुद्धी हाही जीवधर्मच आहे. माणसाच्या इच्छा शक्तीशी तिचा विरोध नाही. बुद्धीचा उगम आणि भावनेचा उगम मानवी जीवनाच्या एकाच अवस्थे–तून झाला असे जीवशास्त्रज्ञाचे मत आहे. धार्मिक सिद्धान्तांची मानवतावादी अत्यंत शास्त्रीय पद्धतीने चिकित्सा करतो. आणि नंतर तो त्याविषयी मत देतो. प्राचीण ग्रीक विचारवंत प्रोटॅगोरस म्हणतो " मानव हाच प्रत्येक गोष्टीचा मानदंड आहे " त्याच्या मते विश्वातील किंवा समाजातील कोणत्या–ही संस्था, मग त्या राजकीय, धार्मिक वा सामाजिक ह्या चांगल्या किंवा वाईट ठरविण्याचे साधण या सर्व गोष्टी व्यक्तिच्या विकासास कितपत पोषक आहेत. यावरुनच त्या ठरविल्या पाहिजेत. याची प्रमुख दोन कारणे आहेत. या सर्व गोष्टीचा निर्माता मानव आहे. या सर्व संस्था मानवाने स्वतःच्या विकासाबरोबर मानवी समाजाच्या विकासासाठी निर्माण केल्या आहेत. या संस्थांचे स्वरुप केवळ साधनरुप आहे. मानसाचे स्वातंत्र्य साकार करणे आणि व्यक्तीच्या अंगी असलेल्या सुप्त शक्तीचा विकास करणे हे त्या संस्थांचे साध्य आहे. मनुष्य आणि समाज यांची परस्पर संबंध असून मनुष्य हा संस्थांचा निर्माता आहे. निर्माता हा मनुष्य असल्यामुळे त्याला केंद्रस्थान मिळाले पाहिजे. विश्वात जी प्राचीन काळापासून उत्क्रांतीची क्रिया चालू आहे. त्यातील सर्वांत उत्क्रान्त स्वरुप मानवाचे आहे, असे एकोणिसाव्या शतकात डार्विनने सिद्ध केले. माणूस हा निसर्गत विचार करणारा प्राणी आहे. मानवी स्वातंत्र्याची अन्वेषणा आणि सत्याविषयीची निष्ठा यामुळे समाजाची प्रगती झाली आहे.

आधुनिक काळात भौतिक शास्त्राच्या विकासा बरोबरच तंत्रविद्या वाढली. तंत्रविद्या ही विज्ञानाची मर्यादित शाखा आहे. त्याचबरोबर सामाजिक शास्त्राचाही विकास झाला. युरोपात औद्योगिक क्रांती झाली. उत्पादन साधनात अमूलाग्र बदल झाले आणि उत्पन्न खूप मोठ्या प्रमाणात वाढले. परंतु उत्पन्नाचे केंद्रीकरण वाढले नवे, नवे, तत्वज्ञान निर्माण झाले. उत्पादनाची साधनांवर खाजगी मालकी असल्यामुळे, व व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा अमर्याद फायदा घेवून काही मूठभर लोकांनी भांडवलशाही निर्माण केली. भांडवलशाही व्यवस्थेमुळे लोक बेकार झाले. व्यक्तीचे स्वातंत्र्यनष्ट झाले. त्यामुळे मानवाकडे दुर्लक्ष झाले. मानसा ऐवजी समाजात यंत्राची पूजा होऊ लागली. ईश्वराची जागा समाजात यंत्राने घेतली जो मानव तिचा निर्माता त्याकडेच दुर्लक्ष झाले मानवाला वगळून केलेला समाजाचा विचार व्यर्थ आहे. म्हणून समाजाची पुनर्रचना करणे भाग आहे ज्या समाजात व्यक्तीच्या

स्वातंत्र्याची प्रतिष्ठा राखली जाईल अशा समाजाची रचना करणे भाग आहे. समाजाची बांधणी, ईश्वराच्या इच्छेने होत नसून समाजाच्या त्या गरजा, उत्पादनाची व्यवस्था, आणि चिरंतन मूल्यावर भिस्त ठेवूनच समाजाची उभारणी होत असते. परंतु व्यक्तीचा विसर पडता कामा नये. व्यक्ती – व्यक्तीचाच समाज बनतो. व्यक्तीचा विचारच अशा समाजात केंद्रस्थानी पाहिजे. मानव हाच सर्व समाजाचा आदर्श आहे. सामाजिक संबंध व्यक्तींच्या हितास पोषक असावयास पाहिजेत. व्यक्ती हाच समाजाच्या प्रगतीचा खरा मापक आहे. विश्वामध्ये अमूर्त अव्यक्त शक्ती आहे तिचा साकार आत्मा म्हणजे राजकीय संस्था या होत. त्यासाठी व्यक्तीने स्वतःचे जीवित राजकीय संस्थेला अर्पण करण्याचे कांही कारण नाही अशी मानवतावादाची विचारसरणी आहे.

